|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ | अंक : १४ | सोमवार दि. २५ मार्च २०२४ ते रविवार दि. ३१ मार्च २०२४ | पाने : ८ | किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड




## माहेरचे प्रेम लपवण्यासाठी आईने मातृत्वाचा बळी दिला पोटच्या पोराचा जीव घेऊन तिने आत्महत्येचा प्रयत्न केला

सोलापूर/क्राईम रिपोर्टर

आई या दोन अक्षरी शब्दात अवघे भाव विश्व समावलेले आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीत आईला साक्षात देवता समजले जाते. कारण ९ महिने मुलाला उदरात वाढवून नंतर काबाडकष्ट करून त्याला मोठे करणारी आई हि एक त्यागमूर्ती आहे. वात्सल्यमुर्ती आहे. आपल्या मुलासाठी कोणताही त्याग कोणतेही धाडस करण्याची तिची तयारी असते. त्यामुळे आई आणि मुलाचे एक अतूट असे नाते असते. पण आजकाल जगात कालानुरूप जे बदल होत आहेत त्यात आई सुद्धा बदलत आहे. त्यामुळे काही माता पूर्वीसारख्या राहिलेल्या नाहीत. आईच ह्रदय प्रेमळ आणि ममतेने भरलेले असते. पण आता मात्र समाजात काही पाषाण ह्रदयी माता जन्माला आल्या आहेत. आणि त्या फक्त स्वतःच्या सुखाचा विचार करतात अशावेळी आपल्या गर्भातील बाळाला त्याने जग बघण्याआधीच गर्भातच मारून टाकायलाही मागेपुढे पाहत नाहीत किंवा आपले पाप लपवण्यासाठी अनैतिक संबंधातून जन्मलेल्या अर्भकालाही मारून टाकतात आणि हे पाप करताना त्यांच्या ह्रदयातील मातृत्वाला जराही पाझर फुटत नाही. सोलापूरच्या माढा तालुक्यातील कव्हे गावात कौशल्य चोपडे नावाच्या एका महिलेने आपले माहेरचे प्रेम संबंध उघडकीस आल्यास आपल्या मुलाला त्रास होईल या भीतीने ६ वर्षांच्या पोटच्या पोराची कुऱ्हाडीचे घाव घालून हत्या केली व नंतर स्वतः गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पण तिला वाचवण्यात आले. या प्रकरणी पोलिसांनी तिला अटक केली आहे.






माढा तालुक्यात कव्हे येथे सहा वर्षीय चिमुरड्याचा २६ फेब्रुवारी २०२४ रोजी खून झाला होता. यानंतर तिच्या आईनेही आत्महत्येचा प्रयत्न केला. मुलाच्या आईवरील उपचार पूर्ण होताच पोलिसांनी तिला अटक करून न्यायालयात हजर केले असता एक दिवसाची कोठडी मिळाली. माहेरातील प्रेमप्रकरण सासरी समजेल आणि पुढे मुलालाही त्रास होईल या भीतीने चिमुरड्याचा खून करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याचे तपासात उघड झाल्याचे पोलिसांनी सांगितले. प्रणव गणेश चोपडे (वय ६) असे खून झालेल्या चिमुरड्याचे नाव असून, त्याचे आजोबा नारायण चोपडे यांनी याबाबत फिर्याद दिली होती. याप्रकरणी मुलाची आई आरोपी कौशल्या गणेश चोपडे हिच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, माहेरातील प्रेम प्रकरण सासू, सासऱ्यांना कळते की काय? या विचाराने ती कायम बैचेन होती. त्यामुळे ती आत्महत्येच्या विचारात होती. सन २०२२ मध्येही तिच्या डोक्यावर थोडासा परिणाम झाला होता. मात्र कुटुंबाने खासगी डॉक्टरांकडून उपचार करून गोळ्या सुरू ठेवल्या होत्या. त्याचबरोबर पती-पत्नींमध्येही काही कारणास्तव कधीकधी भांडणे होत होती. घटनेच्या दिवशी प्रथमतः तिने 'टीव्ही पाहतो काय?' म्हणत लहान मुलाचा गळा आवळला. नंतर तो मरण पावला की नाही याची खात्री करण्यासाठी त्याला हलवून पाहिले. परंतु आपण आत्महत्या केल्यानंतर मुलगा नाहीच मेला तर? असा विचार ...पान ६ वर

## कौटुंबिक वादातून जावयाने साधला नेम सुपारी देऊन त्याने सासऱ्याचा केला गेम



मयत राजेंद्र मराठे



मुंबई/एस.कुमार

कुटुंबातील वाद जर लवकर मिटवले नाहीत तर या वादातून निर्माण झालेली दुष्मनी वाढत जाते. आणि त्यातून नंतर काहीही घडू शकते. कौटुंबिक वादातून रक्ताच्या नात्यातच रक्ताचे पाट वाहून गेल्याच्या घटना घडल्या आहेत. नंदुरबार जिल्ह्याच्या शहादामध्ये अशाच एका घटनेत कौटुंबिक वादातून जावयाने सासऱ्याच्या हत्येची सुपारी दिली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी जावयासह सर्व आरोपींना अटक केली आहे.



जावई हा (राशीला आलेला) दहावा ग्रह असतो, अशी एक म्हण आहे. आजवर जावयांमुळे अनेकांच्या सासू किंवा सासऱ्यांना मनस्तापही झाला आहे. बऱ्याच जणांना जावयाचा उपद्रव अनुभवला आहे. नंदुरबारमध्ये चक्क जावयाने सासऱ्याचा खून करण्यासाठी तीन लाखाची सुपारी दिली आणि मृतदेह शहादा तालुक्यातील एका पुलाखाली फेकून दिला. मुंबई गुन्हे शाखेच्या पोलिसांनी या गुन्ह्यातील चार आरोपींना अटक करून शहादा पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. मात्र जावयाने सासऱ्याचा खून का केला? शहादा येथे वाहन चालक असलेले राजेंद्र उत्तमराव मराठे (वय ५३) हे दिनांक १४ मार्च २०२४ रोजी सकाळी दुचाकीने भाजी मार्केट मधील युनियन बँकेसमोर असलेल्या किराणा दुकानात खरेदीसाठी गेले होते. मात्र बराच वेळ होऊनही ते घरी परत आले नाहीत. त्यामुळे घरात असलेली त्यांची पत्नी मीनाक्षी आणि मुलगा प्रद्युम्न मराठे यांनी त्यांचा सर्वत्र शोध घेतला. परंतु ते कुठेच आढळून आले नाहीत. त्यामुळे त्यांची पत्नी श्रीमती मीनाक्षी राजेंद्र मराठे (वय ५०) यांनी त्यांचे पती राजेंद्र उत्तमराव मराठे ...पान २ वर

## वासनेच्या आगीत पत्नीचे शरीर पेटले पतीने नकार देताच लिंग त्याचे छाटले

बार्शी/क्राईम रिपोर्टर

शारीरिक सुखाला चटावलेली बाई कुठल्या थराला जावू शकते याचे एक भयंकर उदाहरण सोलापूर जिल्ह्यातील बार्शीमध्ये उघडकीस आले आहे. एका विवाहितेचे दुसऱ्या विवाहित पुरुषाबरोबर प्रेम संबंध होते. याच संबंधातून तिने त्याला लग्न करण्यास भाग पाडले. मात्र तो तिच्याशी शारीरिक संबंधात जास्त उत्सुक नव्हता. त्यामुळे ती त्याच्यावर चिडून होती. एकेदिवशी तिने त्याला जबरदस्तीने लॉजवर बोलावले आणि शरीर संबंधाचा हट्ट धरला. पण तिने नकार देताच तिने सरळ त्याचे लिंग कापले यात गंभीर जखमी झालेल्या त्या तरुणाला रुग्णालयात दाखल करण्यात आले असून आरोपी महिलेला अटक केली आहे.

प्रेमविवाह केल्यानंतर पतीने पत्नीसोबत संबंध ठेवण्यास नकार दिल्यानंतर पत्नीने धक्कादायक कृत्य केलं आहे. शारीरिक संबंधाला नकार देताच पत्नीने पतीचं गुप्तांग कापल्याची घटना बार्शीत समोर आली आहे. तरुण यामध्ये गंभीर जखमी झाला आहे. तर या प्रकरणी महिलेला अटक करण्यात आली आहे. प्रेमसंबंधातून एका महिलेने तरुणाला लॉजवर नेऊन शरीर संबंध ठेवण्यास लावले. यासाठी तरुण तयार नसतानाही बळजबरीने त्याला विवस्त्र करून गुप्तांगावर चाकूने वार करून जखमी केलं. तरुणाने दिलेल्या फिर्यादीवरून महिलेवर जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा बार्शी शहर ...पान २ वर

## लग्नाचा तगादा लावताच प्रियकर चिडला मित्राच्या मदतीने प्रेयसीचा काटा काढला







पालघर/क्राईम रिपोर्टर

कामाच्या ठिकाणी स्त्री पुरुषांचे संबंध जुळणे यात काही नवे नाही. पण काही पुरुष केवळ मौजमजा करण्यासाठीच एखाद्या महिलेला लग्नाचे वचन देऊन प्रेमाच्या जाळ्यात ओडतात आणि मन भरले कि लग्नाला नकार देतात. बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या एका महिलेचे ठेकेदाराशी संबंध जुळले. मात्र तिने त्याच्याकडे लग्नाचा तगदा लावताच त्याने मित्राच्या मदतीने तिची हत्या केली आणि पुरावा नष्ट करण्यासाठी तिचे शीर धडावेगळे करून फेकले. मात्र पोलिसांनी मृतदेहाच्या पायातील जोडवी व हातावर गोंदलेले नाव याच्या आधारे मोठ्या कौशल्याने या हेडलेस खून प्रकरणाचा तपास करून दोन्ही आरोपींना अटक केली.

धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथे बांधकाम मदतनीस म्हणून काम करणाऱ्या महिलेची ठेकेदाराचे जवळीक झाल्यानंतर लग्न करण्याचा तगादा धरून मालमत्तेमध्ये हिस्सा मागितल्याने एका आदिवासी महिलेची हत्या मोखाडा तालुक्यात करण्यात आली होती. या महिलेचे डोके धडापासून वेगळे केले असताना हातावर गोंदलेले नाव व पायात असणारे जोडवे याच्या आधाराने पालघर पोलिसांनी या प्रकरणातील दोन आरोपींना अटक केली आहे. ७ फेब्रुवारी २०२४ रोजी मोखाडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत खोडाळा कसारा रस्त्यावरील कोरेगावचे शिवार भागामध्ये वैतरणा नदीवरील ...पान २ वर

## मुलीला त्रास देताच बापाचे डोके फिरले दारुड्या जावयाला सासऱ्याने ठार मारले

बदलापूर/क्राईम रिपोर्टर

प्रत्येक बापाची इच्छा असते कि आपली मुलगी दिल्या घरी सुखी राहावी. त्यासाठी मुलीच्या सासरच्या मंडळींनी ज्या ज्या वस्तूंची मागणी केलेली असते त्या सुद्धा तो देतो. असे असतानाही जेंव्हा मुलीला सासरी त्रास होतो तेंव्हा मात्र त्या बापाला चीड येणे स्वाभाविक असते. बदलापूरच्या मोगरा पाडा येथे जावई मुलीला दारू पिऊन त्रास देतो म्हणून चिडलेल्या एका इसमाने जावयाची निर्घुण हत्या केली. या प्रकरणी आरोपी सासऱ्याला पोलिसांनी अटक केली आहे.

दारू पिऊन मुलीला तसेच संपूर्ण कुटुंबीयांना सतत त्रास देणाऱ्या जावयाचा सासऱ्याने केलेल्या मारहाणीत मृत्यू झाला आहे. बदलापूर-मुरबाड रस्त्यावरील मोऱ्याचा पाडा गावात ही घटना घडली असून पोलिसांनी सासरा संतोष नाईकला अटक केली आहे.ङ्गबदलापूर मुरबाड रस्त्यावरील मोऱ्याचा पाडा या गावात बारवी नदीवरील पुलाखाली एक मार्च रोजी एका व्यक्तीचा मृतदेह आढळला होता. याप्रकरणी कुळगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. तपासादरम्यान योगेश केणे (वय ३८) याचा हा मृतदेह असल्याचे स्पष्ट झाले होते. त्यामुळे पोलिसांनी घटनेबाबतचा तपास सुरू केला होता. या वेळी योगेश केणेला दारूचे व्यसन असून त्याने २९ फेब्रुवारी रोजी नशेत ...पान ६ वर

## दारू पिऊन मुलीला त्रास द्यायचा फार चिडलेल्या सासूने जावयाला केले ठार



मयत दिपक

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर

मुलीचे लग्न करताना जिच्या कुटुंबात तिला द्यायचे आहे त्याची संपूर्ण चौकशी केली नाही तर नंतर पश्चाताप करण्याची पाळी येते. कारण सुरुवातीला चांगला वाटणारा माणूस नंतर मात्र छंदी फंदी निघतो आणि मुलीच्या आयुष्याचा सत्यानाश होतो असाच काहीसा प्रकार बुलढाणा जिल्ह्यातील जावला गावात राहणाऱ्या सुशीला काळे या महिलेच्या बाबतीत घडला तिने आपल्या मुलीचे लग्न दीपक नावाच्या तरुणाशी लाऊन दिले, पण तो दारुडा निघाल्याने मुलगी कायमची माहेरी आली. पण तिथेही जावई येऊन तमाशा करू लागला. त्यामुळे चिडलेल्या सासूने जावयाच्या डोक्यात बेटचे प्रहार करून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी सासूला अटक केली आहे.



गुरूवार २२ फेब्रुवारी रोजी रात्रीचे १० वाजले असावेत, शेगाव शहरात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा मुक्काम असल्याने जिल्ह्यातील अर्धे पोलीस प्रशासन शहरात बंदोबस्ताला होते. शेगांव ग्रामीणचे ठाणेदार वडगावकर बंदोबस्तास तैनात असतांनाच जवळा बुद्रुक गावात सासूच्या मारहाणीत मद्यधुंद जावयाचा मृत्यू झाल्याची माहिती त्यांना मिळाली. सासूने जावयाचा जीव कशासाठी घेतला असेल? हा मोठा प्रश्न होता. पोटच्या लेकीचे कुंकू पुसण्यास आई सज्ज होते, याचा अर्थ नक्कीच त्या जावयामध्ये काहीतरी खोट आहे असा अंदाज करत पोलीस घटनास्थळी पोहचले. तेंव्हा सगळा घटनाक्रम उघड झाला. हतबल झालेल्या आईने लेकीची त्रासातून मुक्तता होण्यासाठी उचललेले पाऊल तिला तुरूंगात ...पान २ वर

## दारूच्या पार्टीतील वाद जीवघेणा ठरला रागाच्या भरात मित्राचाच गळा चिरला



संगमनेर/क्राईम रिपोर्टर

मित्रांमधील दारूच्या पार्टीत कुठल्याना कुठल्या कारणावरू वाद होतच असतात. कारण दारूची नशा डोक्यात गेली कि मग माणसाचे स्वतःवर नियंत्रण राहत नाही. अशावेळी नशेत माणूस काहीही बोलून जातो आणि त्यातून हाणामारी सुरु होते, अशा हाणामारीत एखाद्याचा जीवही जातो. संगमनेरमध्ये ३ मित्र दारू प्यायला बसले होते. यावेळी दारूची नाश होताच त्यांच्यात वाद सुरु झाला. हा वाद इतका विकोपाला गेला कि संतापाच्या भरात एकाने खिशातला चाकू काढून अतुल सावंत याचा गळा चिरला. या प्रकरणी पोलिसांनी अवघ्या २ तासात आरोपींना अटक केली.

रागाच्याभरात व्यक्ती कधी काय करेल याचा काहीच नेम नसतो. कोणत्याही नात्यात गैरसमज असल्यास ते नातं ...पान २ वर

## प्रेमविवाहामुळे सुखी संसाराचे स्वप्न फसले 'सैराट' भाऊ व बापाने बहिणीचे कुंकू पुसले

नाशिक/क्राईम रिपोर्टर



मयत इब्राहिम खान

कुटुंबाच्या विरोधाला न जुमानता केलेले प्रेमविवाह कधीतरी त्या जोडप्यासाठी घातक ठरतात. कारण ज्याच्या घरातील मुलगी पळून जाते त्याची समाजात बदनामी होते. त्यामुळे तो गप्प बसत नाही. मालेगाव मधील अशाच एका घटनेत बहिण पळून गेली म्हणून चिडलेल्या भावाने बापाच्या मदतीने बहिणीच्या पतीचा म्हणजेच भावाजीचा गोळ्या घालून खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी बाप-बेट्यांना अटक केली आहे.



मुलीने प्रेमविवाह करणे, आजही अनेकांना खपत नाही. आपल्या मुलीने आपल्या मनाविरोधात लग्न केले याचा राग अनेकांच्या घरात धुमसत असतो. या रागातून हाणामाऱ्या होत असतात. काही वेळा तर एखाद्याचा खूनही पडतो. प्रेमप्रकरणातून मुलीच्या प्रियकराचा पतीचा खून होण्याच्या घटना राज्यभरात वारंवार पडत आहेत. नाशिक जिल्ह्यात एका तरुणीने घरातून पळून जाऊन प्रेमविवाह केला. या रागातून तिचे वडील व भाऊ तिच्या पतीला धमकावत होते. मात्र प्रेमासाठी त्याने त्याकडे दुर्लक्ष केले. याच रागातून तिच्या भावाने तिच्या पतीचा गोळ्या घालून खून केला. आपल्या बहीणीचा संसार उद्ध्वस्त करून तिला विधवा करणारा भाऊ आता तुरूंगात खडी फोडायला गेला आहे. इस्माईल खानइसा खान (वय ५६) हे मालेगाव शहरातील नाग झोपडपट्टी, मुक्तार शेठ यांच्या घराजवळ रहातात. पत्नी समीमबानो आणि मुले इब्राहिम, सलमान, ...पान २ वर

25 TO 31 MARCH 2024 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 3/23/2024 8:38 PM Page 1



पान १ वरून...

## लग्नाचा तगादा लावताच प्रियकर...

पुलाखाली डोके नसलेले मृतदेह आढळून आला होता. या गुन्ह्याच्या तपासासाठी जव्हार विभागाचे पोलीस तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांची वेगवेगळी पथक तयार करून या गुन्ह्याचा तपास पूर्ण केला आहे. संबंधित दोन आरोपींना पालघर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मोखाडा येथे आढळलेल्या मृतदेह हा ३० ते ३५ वयोगटातील असल्याचे तसेच हातावर ममता असे नाव गोंदले गेले असल्याचे आढळून आले होते. पायांमधील जोडवे तसेच पेहराव पाहता ही महिला आदिवासी समाजाची असल्याचा अंदाज बांधण्यात आला. या महिलेची ओळख पटवण्यासाठी नंदुरबार, जळगाव, धुळे, नाशिक, ठाणे, कल्याण, मुंबई तसेच राज्यातील इतर जिल्ह्यांशी संपर्क साधण्यात आला. मात्र ममता नावाची महिला बेपत्ता असल्याची फिर्याद नोंदवली गेली नसल्याने मृत महिलेची माहिती प्राप्त झाली नव्हती. महिलेच्या पायातील जोडव्याच्या आधारे माहिती प्राप्त केली असता असे जोडवे शिरपूर भागात तयार होत असल्याची माहिती पुढे आली. या जोड्यांवर असणाऱ्या ज्वेलर्स च्या तीन अक्षरी निशाणावरून पोलिसांना ज्वेलर पर्यंत पोहोचता आले. असे जोडवे पावरा समाजातील महिला वापरत असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर शिरपूर तालुक्यातील मतदार यादी तपासून त्यामध्ये असणाऱ्या ४४५ महिला यांची नावं संकलित करण्यात आली. शिरपूर तालुक्यातील पोलीस पाटील यांच्या बैठका घेऊन तसेच व्हाट्सअप समूह तयार करून मयत संदर्भात माहिती संकलित करण्याचा पालघर पोलिसांनी प्रयत्न केला. मृत महिलेच्या एका नातेवाईकाने या प्रयत्नांना प्रतिसाद देऊन काही दिवसांपासून बेपत्ता असलेल्या आपल्या भाचीचा फोटो व भ्रमणध्वनी क्रमांक पोलिसांना दिला. त्यानंतर तांत्रिक तपासाच्या मदतीने पोलिसांनी सुनील उर्फ गोविंद यादव (४५) या ठेकेदाराला सोलापूर येथून व महेश रवींद्र बडगुजर (३१) यांना बोराडी, शिरपूर येथून ताब्यात घेतले आहे. आरोपीला उद्या न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची माहिती पालघरचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी दिली. या हत्येनंतर विशेष कोणतेही पुरावे उपलब्ध नसताना पालघर पोलिसांनी अहोरात्र तपासकार्य राबवून ३० दिवसांच्या अवधीमध्ये या गुन्ह्याचा उलगडा केल्याबद्दल पोलीस अधीक्षक यांनी शोध पथकाच्या अधिकारी, कर्मचारी यांचे कौतुक केले आहे. शिरपूर तालुक्यात बांधकाम व्यवसायात सेंट्रींगचे काम करणारा सुनील यादव याचे त्यांच्याकडे काम करत असणाऱ्या महिलेसोबत प्रेम संबंध निर्माण झाले. या महिलेने आपल्यासोबत लग्न करण्याचे तसेच मालमत्ता आपल्या नावावर करण्याचा तगादात धरला. त्यानंतर ठेकेदाराने आपल्या मित्राच्या सहाय्याने हत्या करण्याचा कट रचला. लोणावळा येथे फिरायला जायचे आहे असे सांगून या महिलेला पालघर जिल्ह्यातील मोखाडा परिसरात आणण्यात आले. निर्जन ठिकाणाचा अंदाज आल्याने या दोघांनी प्रथम रुमालाने महिलेचा गळा आवळून तिला मारून टाकले व पुरावे हाती लागू नयेत म्हणून धारदार शास्त्राने तिचे डोक्याचा भाग वेगळा करून धड वैतरणा नदीच्या पुला खाली ढकलून देण्यात आले होते अशी माहिती पालघर पोलिसांनी पत्रकार परिषदेत दिली.

## कौटुंबिक वादातून जावयाने साधला...

हे हरविले असल्याची तक्रार नंदुरबार जिल्ह्यातील शहादा पोलीस ठाण्यात केली. या तक्रारीची दखल घेऊन शहादा पोलीस ठाण्याचे पथक बेपत्ता राजेंद्र मराठे यांचा शोध घेत होते. मात्र ते मिळून येत नव्हते. पोलिसांची ही शोध मोहीम सुरू असताना दिनांक १६ मार्च २०२४ रोजी शहादा येथील सुज्ञ नागरिक किरण यशवंत चव्हाण यांनी ११२ नंबर डायल करून पोलिसांना नांदर्डे ते तऱ्हावद रस्त्यादरम्यान पुलाच्या खाली अर्धवट जळालेल्या अवस्थेत एका व्यक्तीचा मृतदेह पडला असल्याची माहिती दिली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. यावेळी नांदर्डे ते तळोदा रोडवर, फरशी पुलाचे खाली एक जळालेल्या अवस्थेतील पुरुष जातीचा मृतदेह पडला असल्याची खात्री पटली. परंतु सदरचा मृतदेह अर्धवट जळल्याने ओळख पटत नव्हती. १४ मार्च रोजी राजेंद्र उत्तमराव मराठे हे बेपत्ता झाल्याची तक्रार पोलीस ठाण्यात नोंद होती. त्यामुळे त्या अज्ञात व्यक्तीची ओळख पटवण्यसाठी मराठे यांच्या कुटुंबातील सदस्यांना घटनास्थळी बोलावून घेतले. मृतकाचे कुटुंब घटनास्थळी दाखल झाले. मृतकाची मुलगी श्रीमती भावना राजेंद्र सरोदे - मराठे (वय ३१) आणि भाऊ प्रद्युम्न मराठे यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली. वडिलांच्या शरीराचे अवयव परिसरात ठिकठिकाणी विखुरलेल्या अवस्थेत आढळून आले. अंगावरी कपडे आणि शारीरिक अवयवांवरून मृतांची ओळख पटवण्यात पोलिसांना यश आले.तसेच हा मृतदेह माझ्या वडिलांचा असल्याचे मुलगी आणि मुलाने सांगितले. आता मृतदेहाची ओळख पटवण्यात पोलीसांना यश आले असले तरी वाहनचालक राजेंद्र उत्तमराव मराठे,रा. सदाशिव नगर, शहादा, ता. शहादा, जि नंदूरबार यांना अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरुन जिवे ठार मारुन प्रेत जाळून पुरावा नष्ट केला म्हणून त्यांची मुलगी भावना राजेंद्र सरोदे-मराठे यांच्या फिर्यादी वरून दिनांक १६ मार्च रोजी शहादा पोलीस ठाणे, येथे गु.र.क्र. २२९/२४ कलम ३०२,२०१ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. नंदुरबार जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांनी गुन्ह्याच्या तपासासाठी संबंधित पोलिसांना सूचना करून वेगवेगळे पथक आरोपींच्या शोधासाठी गुजरातमधील सुरत व मध्य प्रदेशातील उज्जैन यानंतर मुंबई येथे पाठविण्यात आले होते. यात अपर पोलिस अधीक्षक नीलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली व स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे किरणकुमार खेडकर व शहादा पोलिस ठाण्याचे प्रभारी पोलिस निरीक्षक शिवाजी बुधवंत यांच्यासह स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पथक व शहादा पोलिस ठाण्याचे पथक पाठविणत आले होते. पोलिसांनी संशयितांच्या मोबाईल संदेशांवरुन मागोवा घेण्यास सुरुवात केली. यादरम्यान १८ मार्च रोजी या गुन्हयातील फरार संशयीत आरोपी हे मुंबईला आले असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखा, नंदूरबार यांनी मुंबई गुन्हे शाखेच्या कक्ष-११ यांना कळविली होती. त्याअनुषंगाने संशयीत आरोपींचा कांदिवली हद्दित शोध घेतला असता,ते गोराई परिसरात असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली. गुन्हे शाखेच्या पथकाने त्या परिसरात अधिक शोध घेतला असता, ते मिळून येत नव्हते. पो .नि. घोणे व पथक यांनी तांत्रिक व मानवी कौशल्याचा अचूक वापर करून चार संशयीत आरोपी हे पेप्सी ग्राउंडच्या समोर, गोराई नं २, बोरीवली (प), मुंबई येथून पळून जाण्याच्या तयारीत असताना त्यांना गुन्हे शाखेच्या पथकाने शिताफीने ताब्यात घेतले. त्यापैकी दोन विधि संघर्षग्रस्त बालक असल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या संशयितांमध्ये नीलेश उर्फ तुकाराम पाटील (२५, रा.सालदारनगर, शहादा), लकी बिरारी (१८, भादा, ता.शहादा)व यांच्यासह १६ आणि १७ वर्षांच्या दोन बालकांना ताब्यात घेण्यात आले. या चार जणांना गुन्हे शाखेच्या कार्यालयात आणून त्यांची चौकशी केली. तेव्हा मयत इसमाचा जावई गोविंद सुरेश सोनार (वय ३५ रा.गुरुकुलनगर नंदुरबार) याने त्याचे सासरे राजेंद्र उत्तमराव मराठे, यांचेमध्ये असलेल्या जून्या घरगुती वादावरून त्यांचा खून करण्याकरीता यातील ४ अटक आरोपींना ३ लाखाची सुपारी दिली असल्याचे तपासात निष्पन्न झाले,पोलिसांनी नंदुरबार येथून मयताचा जावई गोविंद सोनार (३४) यास चौकशीसाठी ताब्यात घेतल्यानंतर राजेंद्र मराठे यांची सुपारी घेऊन हत्या केल्याची कबुली दिली. मयत इसमाचा जावई गोविंद सुरेश सोनार याने त्याचे सासरे राजेंद्र उत्तमराव मराठे, यांचेमध्ये असलेल्या जून्या घरगुती वादावरून त्यांचा खून करण्याकरीता ३ लाखाची सुपारी यातील ताब्यात घेतलेल्या ४ आरोपीना दिली असल्याचे आतापर्यतच्या तपासात निष्पन्न झाले आहे. गुन्हे शाखेच्या पथकाने या गुन्ह्यातील एका आरोपीत इसमाच्या मोबाईलमध्ये गुन्हा घडतेवेळेस व पुरावा नष्ट करतेवेळेस घेतलेली व्हिडीओ क्लिप मिळून आलेली आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या संशयितांचे ताब्यात मयत व्यक्तीचा १ मोबाईल संच व संशयितांचे ताब्यातील ४ मोबाईल संच व रोख रक्कम ४५ हजार ३३० रुपये मिळून आले आहे. नमूद संशयित इसमांचा या गुन्हयातील सहभाग स्पष्ट झाल्याने त्यांना पुढिल कारवाईकरीता स्थानिक गुन्हे शाखा, नंदूरबार येथिल पोलीस पथकाचे ताब्यात देण्यात आले आहे. ही यशस्वी कामगिरी मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती, पोलीस सह आयुक्त (गुन्हे) लखमी गौतम, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) शशि कुमार मीना, पोलीस उप-आयुक्त (प्र-१), विशाल ठाकूर, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रकटीकरण-उत्तर) महेश देसाई यांच्या मागदर्शनाखाली व गुन्हे शाखा कक्ष ११ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक चव्हाण यांचे निर्देशनाखाली पोनि भरत धोपे, सपोनि अभिजीत जाधव, मसपोनि यादव, पोउनि शिंदे, पोउनि कांबळे, पोउनि मेतर, सफौ. नाईक, पोह गायकवाड, नावगे, खांडेकर, सावंत,कदम, खताते, पोशि देशमुख, मपोशि शेख, मपोशि गोसावी यांनी पार पाडली आहे. शहादा येथील राज्य परिवहन महामडंळातील वाहक राजेंद्र मराठे यांच्या हत्येची उकल करण्यात नंदुरबार पोलिसांना यश आले असून कौटुंबिक वादातून जावयानेच सासऱ्याच्या हत्येचा कट रचल्याचे उघड झाले आहे. सुमारे तीन लाख रुपयांची सुपारी हत्येसाठी देण्यात आली होती. या प्रकरणी जावयासह सहा मारेकऱ्यांना शहादा आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कांदिवली येथून स्थानिक पोलिसांच्या मदतीने ताब्यात घेतले आहे. नीलेश उर्फ तुकाराम पाटील (२५ रा.सालदारनगर, शहादा), जयेश मगन सुतार (३०,रा. मुरली मनोहर कॉलनी, शहादा), लकी किशोर बिरारी (१८,रा. भादा, ता.शहादा) व जावई गोविंद सोनार (३४, गुरुकुलनगर, नंदुरबार) यांना अटक करण्यात आली आहे तर १६ आणि १७ वर्षांच्या दोन बालकांना ताब्यात घेण्यात आले. घटनेचा पुढील तपास नंदुरबारचे पोलिस अधीक्षक श्रवण दत्त एस यांच्या मार्गदर्शनाखाली शहादा पोलीस ठाण्याचे तपास प्रभारी पोलिस निरीक्षक शिवाजी बुधवंत करीत आहेत.

## दारू पिऊन मुलीला त्रास द्यायचा ...

घेऊन गेले. शेगाव तालुक्यातील जवळा बु गावात सुशीला काळे ही ५५ वर्षीय महिला, तिची मुलगी वैष्णवी व ८ वर्षीय नातू साई यांच्यासह रहायची. दोन्ही माय-लेकी काबाडकष्ट करून तीन जीवांच्या प्रपंचाचा गाडा हाकायच्या. सुशीलाबाईचं उभंआयुष्य तसं कष्टातच गेलं. लग्नानतर नवऱ्याशी न पटल्याने वादापेक्षा समझोता बरा, म्हणून २६ वर्षांपूर्वी नवऱ्यास सोडचिठ्ठी देऊन ४ वर्षांच्या चिमुकल्या वैष्णवीस कडेवर घेऊन तिने माहेर जवळा गाठले. मुलीलाच आधार मानून तिने मुलगी वैष्णवीचा मोठ्या हिंमतीने सांभाळ केला. शेतमजुरी करून राबराब राबून मुलीला लहानाचे मोठेकेले. मुलीचे हात पिवळे करण्याची वेळ आल्यावर, जवळच्या नातेवाईकांनी शेगावचे स्थळ सुचवले. उपवर मुलगा दिपक पानपट्टी व भाड्याने गादी देण्याचा व्यवसाय करत असल्याचे समजले. दोन्हीकडचीपसंती झाल्यावर मुलगा नसल्याने, होणारा जावई दिपक याच्यामध्येच मुलगा पहात सुशीलबाईने मोठ्या विश्वासाने वैष्णवीचा हात दिपकच्या हातात दिला. २०१३ मध्ये शेकडो पाहुण्यांच्या साक्षीने दोघांच्याही डोक्यावर अक्षता टाकल्या. सुखी संसाराची स्वप्नपहात वैष्णवीने दिपकच्या घराचा उंबरठा ओलांडला. काही महिने सुरळीत गेले. दोघांच्या संसारवेलीवर साई नावाचे गोंडस फुल उमलले. दिपक कधी-कधी दारू प्यायचा. वैष्णवीने त्याला बऱ्याचदा समजावले, पण दिपकचेपिणे कमी होण्याऐवजी अधिक वाढले. दररोज दारू पिऊन येणे आणि वैष्णवीने जाब विचारल्यावर तिला मारहाण करणे हा त्याचा दिनक्रम झाल्यामुळे त्याच्या त्रासास कंटाळून वैष्णवी बऱ्याचदा माहेरी गेली, मात्र नातेवाईकांनी समजूत घालून तिला परत सासरी आणले. नवऱ्याच्या त्रासाबाबत शेगाव ग्रामीण व शेगाव शहर पोलीस स्टेशनला बऱ्याचदातक्रारीहीकेल्या.मात्र दिपकमध्ये कोणतीही सुधारणा होण्याची चिन्हे दिसत नव्हती. अखेरीस वैष्णवीने मुलगा साईला घेऊन २०१८ मध्ये नेहमीसाठी दिपकचे घर सोडले. ती माहेरी आईजवळ जवळा येथे रहायला आली. आई प्रमाणेच तिच्यावरही घर-संसार सोडण्याची बिकट परिस्थिती ओढावली होती. फरक एवढाच की, आईने सोडचिठ्ठी दिली होती तर वैष्णवीने नाते कायम ठेवत कंटाळून घर सोडले होते. नातेवाईकांनीही दिपकचा प्रकार नेहमीचा असल्याने वैष्णवीला समजावण्याच्या भानगडीत न पडण्याचा निर्णय घेतला. वैष्णवी परत घरी येतनसल्याने दिपक चिडला होता. तो सासूच्या घरी दारू पिऊन यायचा, राडा करायचा, अश्लील शिवीगाळ करून दोन्ही माय-लेकींसह चिमुकल्या मुलासही मारहाण करायचा, त्यामुळे सुशीलाबाईवैष्णवीसह चिमुकला साई असे तिघेसुद्धा त्याच्या दहशतीला धास्तावले होते. सुरूवातीला शेजाऱ्यांनी व नातेवाईकांनी दिपकला समजावलेपण तोसमजूत घालणाऱ्यांना उलट शिवीगाळ करत असल्याने, त्याच्या नादी लागण्याचा कोणी प्रयत्नच करत नव्हते. आठवड्यातून, पंधरवड्यातून मद्यधुंद अवस्थेत सासूच्या घरी जाऊन, दरवाजा ठोकणे, घरात घुसून मारहाण करणे हा त्याचा ठरलेला प्रकार होता. तो दारू पिऊन आल्यावर त्या दोघी माय-लेकी घरास बाहेरून कुलूप लावून घरात लपून बसायच्या. त्याने त्यांना जगणेच नकोसे करून सोडले होते. दि. २२ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ७.०० वाजता दिपक दारूच्या नशेत झिंगत सुशीलाबाई यांच्या घरासमोर आला. दिपक आल्याची चाहूल लागताच सुशीलाबाईने घराच्या दरवाजास व अंगणाच्या गेटला कुलूप लावून घेतले. दुसऱ्या दरवाजातून नेहमीप्रमाणे घरात जाऊन बसली.दिपकदारूच्या नशेत पत्नी वैष्णवी व सासू सुशीलाबाई यांना अश्लील शिवीगाळ करून दरवाजा उघडा असे दरडावून ओरडून म्हणू लागला. घरातून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने चवताळलेल्या मद्यधुंद दिपकने अंगणाच्या गेटचे कुलूपएका वजनदार दगडाने तोडले. तो आत गेला आणि मुख्य दरवाजास लाथा मारू लागला, तरीही दरवाजा न उघडल्यामुळे तो दगडाने दरवाजा तोडू लागला. दरवाजा तोडतांना दारूची नशा उतरल्याने दिपकने पुन्हा दारूची बाटली घशात ओतली. नव्या दमाने दरवाजा तोडण्याच्या कामास लागला. काही वेळात दरवाजाची कडी वाकली, त्यामुळे आता दिपककोणत्याही क्षणी घरात शिरणार आणि मारहाण करणार अशी खात्री पटल्याने सुशीलाबाई भीतीने थरथर कापू लागली. किती दिवस असे भीतभीत जगायचे. आपल्या मागेही दिपक आपल्या मुलीचा छळ करत रहाणार आहे, त्यापेक्षा त्याला आपणच अद्दल घडवली पाहिजे या विचाराने तिने हिंमत केली. ती घरातील मिरची पावडरची पूड हातात घेऊन घराबाहेर आली. दुसऱ्याच क्षणी दरवाजासमोर आकांडतांडव करणाऱ्या दिपकच्या चेहऱ्यावर तिने मिरची पावडर टाकली. आधीच दारूच्या नशेत असणारा दिपक सासूला पाहून संतापला होता, तो तिच्यावर हल्ला करण्याच्या तयारीत असतांना अचानक त्याच्या डोळ्यांची आग आग झाली. त्याच्या चेहऱ्यावर व डोळ्यातपणतिखट मिरची पावडर लागल्याने त्याला तीव्र वेदना होत होत्या. तो डोळे चोळत असतांनाच संधी साधत ती क्रिकेटची बॅट हातात घेऊन दिपकवर तुटून पडली. हातातील बॅटचा तुकडा पडला, सुशीलाबाई इतकी चिडली होती की ती थांबली नाही. तुटलेले बॅट फेकून देत तिने बाजूला पडलेले लाकडी दांडके उचलले. त्या दांडक्याने जावयाला तुफान मारहाणकरत ती तिच्या मनातील खदखद जावयावर काढत होती. सासूचा रौद्रवतार पहात दिपक जमिनीवर कोसळला. काही मिनिटांनी उठण्याचा अयशस्वीप्रयत्न करत, जमिनीवर आडवा झाला तो नेहमीसाठीच. दारूच्या व्यसनाने कृश झालेल्या दिपकच्या जीवनाचा 'दिपक' केंव्हाच विझला. आयुष्यभर दारूच्या नशेत असणाऱ्या दिपकचा शेवटही दारूच्या नशेतच झाला. दोन तास होऊनही दिपक काहीच हालचाल करत नसल्याने पोलिसांना कळवण्यात आले. घटनेचे गांभीर्य पहाता ठाणेदार वडगावकर हे पोलीस उपनिरीक्षक शिंदे व इतर सहकाऱ्यांसह बंदोबस्तास असलेल्या आनंदविहार येथूनच घटनास्थळी रवाना झाले, पोलिसांची गाडी सात मिनिटात ८ किलो मीटर अंतरावर असलेल्या जवळा गावात पोहचली. घटनास्थळी सुशीला काळे या महिलेच्या घरासमोर अंदाजे ३५ वर्षीय एक सडपातळ व्यक्ती पडलेला होता. त्याचा चेहरा मिरची पावडरने लाल झाला होता. हाताला झालेली जखम स्पष्ट दिसत होती. त्या मृतदेहाजवळ सर्वत्र मिरची पावडर पडलेली होती. जवळच तुटलेली क्रिकेटची बॅट, लाकडी फळ्या व एक दगड पडलेला होता. मृतदेहाजवळ दोन महिला, एक चिमुकला व गावातील मोजक्या नागरिकांशिवाय कोणीच नव्हते. सुशीला काळे चिंताग्रस्त नजरेने पोलिसांकडे पहात होती, तर चिमुकला मुलगा तेवढ्या रात्री घाबरलेल्या अवस्थेत काय होत आहे हे नजरेने टिपत होता. पोलिसांनी माहिती घेतली असता सासू सुशीलाने दारू पिऊन त्रास देणारा जावई दिपक हाडोळे यास बॅटने मारहाण केली. या मारहाणीने जखमी होऊन जमिनीवर पडला तो उठलाच नसल्याचे उपस्थितांनी पोलिसांना सांगितले. शेगांव ग्रामीण पोलिसांनी मृतदेह विच्छेदनासाठी शेगाव येथील सईबाई मोटे उपजिल्हा रूग्णालयात रवाना केला. मृतकाची पत्नी वैष्णवी दिपक हाडोळे यांच्या तक्रारीवरून शेगांव ग्रामीण पोलिसांनी आरोपी सासू सुशीला अवधूत काळे (५५) हिच्यावर अप. नं.५४/२४ कलम ३०२ भा.दं.वि. अन्वये गुन्हादाखल केला. पोलिसांनी सकाळी घटनास्थळ पंचनामा करून बॅट, दगड,लाकडी फळ्या जप्त करूनसंशयित सासू सुशीला काळेला ताब्यात घेतले. दारूड्या जावयाच्या त्रासाला कंटाळलेल्या सासूने जावयाचा बळी घेतला होता. एका सुखी संसारात दारूमुळेच विघ्न आले, आणि त्या संसाराची अखेरहीदारूतच झाली. या घटनेचा तपास जिल्हा पोलीस अधीक्षक सुनिल कडासने, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी विनोद ठाकरे, पोलीस निरीक्षक दिलीप वडगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गजानन शिंदे, पोलीस हेडकॉन्स्टेबल भानुदास तायडे, अरूण मेटांगे, निलेश हिवाळे, धनराज माने, पोलीस नाईक उमेश आखरे, पोलीस कॉन्स्टेबल मुकेशकरत आहेत.

## प्रेमविवाहामुळे सुखी संसाराचे स्वप्न ...

यासिन व एक मुलगी असे त्यांचे कुटुंब. त्यांच्या तीन मुलींची लग्ने झाले असून मोठा मुलगा इब्राहिम हा चार चाकी जुन्या गाडया खरेदी-विक्रीचा व्यवसाय करत होता आणि त्याच्यावरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू होता. दि. ५ फेब्रुवारी २०२४ रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास इस्माईल खान यांना त्यांचा जावई इम्रान शेख यांचा फोन आला. त्यावेळी इस्माईल खान हे घराजवळ असलेल्या सबरन हॉटेलजवळ चहा पित उभे होते. जावयाने सांगितलेली माहिती ऐकून इस्माईल खान यांच्या हातातील चहाचा कप खालीच पडला. त्यांचे पायही थरथरू लागले. त्यावेळी त्यांच्यासोबतअसलेल्या लोकांनी 'क्या हुआ?' असे विचारताच त्यांनी आपल्या मुलाला हाक मारण्यास सांगितले. त्यांचा मुलगा यासिन तेथे आला, तेंव्हा ते त्यास म्हणाले, 'यासिन, तेरे भाई को किसीने गोली मारी, तुम्हारे जिजानेअभी ये बात मुझे बताई है, आपुन को जाना होगा' तेंव्हा त्यांच्यासमवेत असलेल्या लोकांना नेमकं काय झालं हे समजून कोणीतरी इब्राहिम खान यास गोळ्या घातल्या होत्या.हे ऐकून तेसगळेच तातडीने घटनास्थळाकडेम्हणजेच रमझानपुरा भागातील ओवाडी नाला, नमरी मशिद परिसरात जाण्यास पोहचले. इस्माईल खान हे आपला मुलगा यासिन आणि गल्लीतील अन्सारी अली हसन मेहंदी हसन आणि खलील अहमद रईस अहमद यांना घेवून घटनास्थळी पोहचले. त्यांनी पाहिले असता इब्राहिम खान हा मोटरसायकलसह जमिनीवरजखमी अवस्थेत पडलेला होता. त्याच्या डोक्यातून रक्त वहात होते. त्याच्या डोक्यात गोळी लागली होती. त्याच्याजवळच मोबाईल फोन पडलेला होता व एक बंदुकीची पुंगळी पडलेली होती. पडलेल्या मोटरसायकलचा लाईट चालू होता. याचा अर्थ इब्राहिम मोटरसायकलवरून जात असतांना त्याला गोळी मारली होती. रमझानपुरा भागातील ओवाडी नाला येथे असणाऱ्या नमरी मशिदजवळून मोटरसायकलवरून इब्राहिम खान जात असतांना त्याच्यावर कोणा अज्ञातांनी गोळ्या झाडल्या होत्या, ही माहिती इस्माईल खान यांच्या जावयाने त्यांना दिली होती. त्या माहितीवरून ते त्याठिकाणी ते आले होते. या घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक अनिकेत भारती, सहाय्यक पोलीस अधीक्षक तेगबिरसिंह संधू, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राजू सुर्वे, पोलीस उपनिरीक्षक संदीप पाटील, रमझानपुरा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डी.जी. बडगुजर, कॉन्स्टेबल नरेंद्र कीळी, देवा गोविंद, चेतन संवत्सरकर व इतरांनी धाव घेतली होती. घटनास्थळी आल्यावर पोलिसांनी जखमीची पहाणी केली आणि रुग्णवाहिकेला ताबडतोब पाचारण केले. रक्तबंबाळ झालेल्या इब्राहिमला रुग्णवाहिकेतून शासकीय सामान्य रुग्णालयात आणून दाखल करण्यात आले. तेथील डॉक्टरांनी त्याला तपासले असता तो मृत झाल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान या घटनेची वार्ता शहरात पसरली. पोलिसांनी इब्राहिमला कोणी ठार मारले? कोणी आणि कशासाठीत्याच्यावर गोळी झाडली? याबाबत तपासास सुरुवात केली. इब्राहिमचे वडील इस्माईल खान यांनी पोलिसांना सांगितले की, आपला मुलगा इब्राहिम खान याने चार वर्षांपूर्वी मसूद गांजावाला याचा गांजा चाळीसगाव पोलीस स्टेशनला पकडून दिला होता, तेंव्हापासून मसूद गांजावाला हा इब्राहिमवर चिडून होता, त्यामुळे त्याने तीन वर्षापूर्वी इब्राहिमयाच्यावर गोळीबार केला होता. इब्राहिमने तेंव्हा मालेगाव शहर पोलीस ठाण्यात त्याच्याविरोधात फिर्याद दाखल केली होती. तसेच सुमारे दोन महिन्यापूर्वी इब्राहिमने मालेगाव शहरातील युसुफ छिजड़ा याच्या मुलीसोबत पळून जावून प्रेमविवाह केला होता. ती आता त्यांच्या घरी नांदत होती, तेंव्हा चिडून जावून युसुफ छिजडा व त्याचा मुलगा रियान यांनी त्यांच्या घरी येवून 'तेरे को देख लूंगा, तुझे मार डालूंगा' अशी धमकी दिली, शिवाय ते त्याला अधून-मधून धमकावत होते. या दोन्हीपैकी कोणीतरी त्याचा खून केला असावा अशी शंका इब्राहिमच्या वडीलांनी पोलिसांसमोर व्यक्त केली. या प्रकरणात दोन संशयित होते. दोन्ही बाबी गंभीर होत्या. त्यावरून रमझानपूर पोलीस ठाण्यात ईस्माईल खान इसा खान यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा रजि.नं. २२/२०२४ भा.दं.वि. कलम ३०२, ५०६, १२० व व शस्त्र अधिनियम २५ (३) कलमाखाली गुन्हा नोंद झाला. या फिर्यादीमध्ये ईस्माईल खान यांनी मसूद गांजावाला (रा. दरेगाव, मालेगाव), पापा फिटींग उर्फ शेख तौसिफ (रा. रमझानपूरा, मालेगाव, जलाल रा. अक्तराबाद),युसुफ छिजडा व त्याचा मुलगा रियान युसुफ छिजडा (रा. दानिश पार्क, देवीचा मळा, दरेगाव-मालेगाव) यांच्यावर संशय व्यक्त केल्याने त्यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस आरोपींचा शोध घेवू लागले. इब्राहिम शेख इस्माईल ऊर्फ इब्राहिम गांजावाला (वय२९, रा. नागछाप झोपडपट्टी) याच्या खुनाची फिर्याद दाखल होताच पोलिसांनी युसुफ छिजडा व त्याचा मुलगा रियान या दोघांना अटक केली. त्यांच्याकडे चौकशी करताच त्यांनी गुन्हा कबुल केला. आपल्या बहीणीला पळवून नेल्याचा राग डोक्यात असल्याने रियान याने इब्राहिमचा खून केला. यामध्ये त्याला गावठी पिस्तुल शेख शहजाद रफीक (रा. जाफरनगर) याने पुरवले होते. इतकेच नव्हे तर घटनास्थळावरून पळून जाण्यास समीर शेख शब्बीर (रा. निहालनगर) याने मदत केली होती. या माहितीवरून पोलिसांनी रिहानला गावठी पिस्तूल पुरवणारा शेख शहजाद रफीक (२३, रा. जाफरनगर, ह. मु. सिल्लोड) व त्याला घटनास्थळावरून पळून जाण्यास मदत करणारा समीर शेख शब्बीर (१९, रा. निहालनगर) या दोघांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेले गावठी पिस्तूल, चार मोबाईल फोन आणि दुचाकी जप्त केली आहे. अशा प्रकारे रमझानपुरा पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने या गुन्ह्याचा छडा लावला.

## दारूच्या पार्टीतील वाद जीवघेणा...

आणखी बिघडत जातं आणि त्याचा वाईट शेवट होतो. याचीच प्रचिती संगमनेरमध्ये आली आहे. येथे दोन मित्रांनी आपल्या एका मित्राची निर्घृण हत्या केलीये. शुल्लक कारणावरून झालेल्या वादातून दोघांनी आपल्याच मित्राला दारु पाजून त्याचा खून केल्याची खळबळजनक घटना संगमनेर तालुक्यात घडली आहे. संगमनेर-लोणी रस्त्यापासून सुमारे तीस फूट आतील मैदानात शुक्रवारी रात्री हा प्रकार घडल्याचं उघडकीस आलंय. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपासाला सुरुवात केली आणि अवघ्या दोन तासांतच दोघांना संशयावरुन ताब्यात घेतले आहे. अब्दुल उर्फ अतुल शोभाचंद सावंत असं हत्या झालेल्या तरुणाचं नाव असून या घटनेने संगमनेर (डपसरापशी) तालुक्यात खळबळ उडाली आहे. शनिवारी सकाळी समनापूर शिवारातील एका हॉटेल जवळील मोकळ्या पटांगणात गळा चिरलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. माहिती मिळताच पोलीस उपअधीक्षक सोमनाथ वाघचौरे आणि पोलीस निरीक्षक भगवान मथुरे यांनी आपल्या फौजफाट्यासह घटनास्थळी धाव घेतली. सदर व्यक्तीची हत्या करण्यात आल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येताच पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. घटनास्थळावर बिअरच्या तीन बाटल्या, काडिपेटी, चप्पल यासह झटापट झाल्याच्या खूणा दिसून येत होत्या. मृतदेहापासून काही अंतरावरच मयताचा गळा चिरण्यासाठी वापरलेला चाकूही आढळून आला. घटनास्थळावर सापडलेल्या बिअरच्या बाटल्या कोठून आणल्या याचा तपास करुन पोलिसांनी अवघ्या तासाभरातच आरोपींची ओळख पटवली. मात्र अटक होण्याच्या भीतीने दोन्ही संशयीत रात्रीपासूनच पसार झाले होते. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेत त्यांचा माग काढण्यास सुरुवात केली आणि पुढील दोन तासातच दोन्ही आरोपी पोलिसांच्या जाळ्यात अडकले. हत्या करणारे दोन्ही आरोपी आणि मयत एकाच समाजाचे आणि नेहमीसोबत राहणारे होते. शुक्रवारी (२२ मार्च) रात्री त्यांनी वडगाव पान जवळील एका बिअर शॉपीमधून तीन बिअरच्या बाटल्या घेतल्या. तिघांनीही समनापूर शिवारातील एका हॉटेल जवळील मोकळ्या पटांगणात बसून त्या रिकाम्या केल्या. त्यानंतर त्यांच्यात वाद सुरु झाले आणि त्यातून एकाने जवळील चाकू काढून अब्दुल उर्फ अतुल शोभाचंद सावंत (वय २२, रा. समनापूर) याचा धारदार चाकूने गळा चिरुन खून केला. घटनेनंतर दोघेही आरोपी तेथून पसार झाले होते. त्यांना ताब्यात घेतल्यानंतर मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार या घटनेमागे नाजूक कारण असण्याची शक्यता आहे. पोलिस या घटनेचा अधिक तपास करत असून हत्येच्या घटनेने खळबळ उडाली आहे.


## वासनेच्या आगीत पत्नीचे शरीर...

पोलिस ठाण्यात दाखल झाला आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, कमलेश काकासाहेब सांगळे (वय २४ रा. शिरूर घाट ता. केज जि. बीड) याचे मोबाइलचे दुकान होते. या दुकानात महिला कामानिमित्त आल्यानंतर त्यांची ओळख झाली आणि त्यांचे प्रेमसंबंध निर्माण झाले. आधीपासून विवाहित असलेल्या महिलेने तरुणाकडे लग्नासाठी तगादा लावला. मात्र सांगळे याने नकार दिल्यानंतर ब्लॅकमेल केलं. महिलेने मार्च २०२३ मध्ये तरुणावर शिवाजी नगर पोलिस ठाणे येथे बलात्काराचा गुन्हा दाखल केला. बलात्कार प्रकरणी त्याला अटकही झाली. दोन महिन्यांनी जेलमधून बाहेर आल्यानंतरही ती त्रास देत होती. शेवटी तरुणाने ऑगस्ट २०२३ मध्ये तिच्यासोबत आळंदीत विवाह केला. लग्नानंतरही महिला तरुणासोबत राहत नव्हती. मात्र ती त्याला फोन करून आणि दुकानात जाऊन त्रास देत होती. तिच्या त्रासाला कंटाळून तरुण ३ महिन्यांपूर्वी बार्शी तालुक्यात नातेवाइकाकडे राहण्यास गेला. पण त्यानंतर गुरुवारी २१ मार्च रोजी पहाटे ५ वाजता तिने समाज माध्यमावरील कमलेशच्या अकाउंटवरून फोन केला. त्याला धमकी देत गुरुवारी दुपारी बार्शी एस.टी. स्टॅन्डवर भेटण्यासाठी बोलावले. तेथून ते दोघेही तेथीलच एका लॉजवर गेले. लॉजवर तिने शरीर संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी तरुणाने नकार दिला. तरीही कमलेशचे कपडे काढत त्याच्या गुप्तांगावर चाकूने वार केले. या प्रकरणी महिलेला अटक केली असून तिला पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# प्रदीप शर्मा यांना जन्मठेपेची शिक्षा

## लखन भैया बनावट एन्काऊंटर प्रकरणी दोषी

**वसई/प्रतिनिधी**




चकमकफेम माजी पोलिस अधिकारी प्रदीप शर्मा यांना लखन भैया चकमक प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. याप्रकरणी प्रदीप शर्मा यांना निर्दोष ठरवणारा कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय रद्द करत मुंबई उच्च न्यायालयाने शर्मा यांना दोषी ठरवले आणि इतर दोषीप्रमाणेच जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. २००६ मध्ये झालेल्या लखन भैय्या एन्काउंटरची चौकशी करण्यात आली होती. त्यानंतर ती चकमक बनावट असल्याचं एसआयटी चौकशीत उघड झालं होतं. याप्रकरणी मुंबई पोलिसातील १३ अधिकारी आणि पोलिसांना अटक करण्यात आली होती. त्यात प्रदीप शर्मांचाही समावेश होता. त्यानंतर २००८ मध्ये त्यांना निलंबितही करण्यात आले होते. मात्र न्यायालयाने त्यांची निर्दोष मुक्तता केली होती. शर्मा हे १९८३ च्या बॅचचे अधिकारी असून २०20 मध्ये ते निवृत्त होणार होते. परंतु त्याआधीच त्यांनी स्वेच्छा निवृत्ती स्वीकारून राजकारणात पाऊल ठेवले होते. मात्र राजकारणात त्यांना अपयश आले.

लखन भैया एन्काऊंटर प्रकरणी प्रदीप शर्मा दोषी आढळले आहेत. लखन भैया एन्काऊंटर प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने मोठा निर्णय देत प्रदीप शर्मा यांना दणका दिला आहे. हायकोर्टाने निर्दोषत्व रद्द करून जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. तीन आठवड्यांत शर्मा यांना मुंबई सत्र न्यायालयापुढे शरण येण्याचे निर्देश दिले आहेत. २००६ च्या लखन भैया एन्काउंटर प्रकरणाशी संबंधित अनेक याचिकांवर मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी मोठा निर्णय दिला आहे. न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती गौरी गोडसे यांच्या खंडपीठाने ८ नोव्हेंबर २०२३ रोजी या २००६ मध्ये दाखल केलेल्या १६ अपीलांच्या सुनावणीवर निकाल राखून ठेवला होता. कुख्यात गँगस्टर छोटा राजनचा सहकारी राम नारायण गुप्ता उर्फ लखन भैयाच्या बनावट चकमक प्रकरणी प्रदीप शर्मा दोषी असल्याचं हायकोर्टाने म्हटलं आहे. या प्रकरणात २०१३ मध्ये सेशन कोर्टाने २१ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती आणि एन्काउंटर स्पेशलिस्ट प्रदीप शर्मा यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली होती. वसईत राहणाऱ्या लखन भैया विरुद्ध गँगस्टर ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. ११ नोव्हेंबर २००६ रोजी मुंबई पोलिसांच्या पथकाने छोटा राजन टोळीचा संशयित सदस्य म्हणून त्याला ताब्यात घेतलं होतं. त्याच दिवशी संध्याकाळी लखन भैय्याचं पश्चिम मुंबईतील वर्सोवा येथे एन्काऊंटर झालं होतं.

या इन्काऊंटरचं नेतृत्व माजी एन्काऊंटर स्पेशलिस्ट प्रदीप शर्मा यांनी केले होते. ही एक कथित बनावट चकमक असल्याचा आरोप करत लखन भैयाच्या भावाने याच्या विरोधात न्यायालयात धाव घेतली होती. ज्या २०१३ मध्ये मुंबईतील सत्र न्यायालयाने या प्रकरणात १३ पोलिसांसह २१ जणांना दोषी ठरवले आणि सर्व दोषींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या प्रकरणात न्यायालयाने प्रदीप शर्मा यांची निर्दोष मुक्तता केली होती. न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि न्यायमूर्ती गौरी गोडसे यांच्या खंडपीठासमोर चकमक प्रकरणातील दोषींनी दाखल केलेल्या अपीलांवर सुनावणी सुरू होती.

लखन भैय्याचा भाऊ आणि वकील राम प्रसाद गुप्ता यांनी प्रदीप शर्माच्या निर्दोष सुटकेविरोधात अपील दाखल करून दोषींच्या शिक्षेत वाढ करण्याची मागणी केली होती. या प्रकरणी न्यायालयाने आपला आदेश राखून ठेवला होता. या प्रकरणात प्रदीप शर्मा यांच्या निर्दोष सुटकेविरोधात राज्य सरकारने याचिकाही दाखल केली होती. राज्य सरकारने नियुक्त केलेले विशेष सरकारी वकील राजीव चव्हाण यांनी प्रदीप शर्मा यांच्या निर्दोष सुटकेच्या विरोधात युक्तिवाद केला होता. एकेकाळी अंडरवर्ल्डमधील गुंडांचा कर्दनकाळ अशी ओळख असणारे एन्काऊंटर फेम प्रदीप शर्मांना मुंबई उच्च न्यायालयाकडून जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. प्रदीप शर्मा यांची पोलीस दलातील कारकीर्द वादग्रस्त राहिली आहे. त्यांनी केलेले काही एन्काऊंटर वादग्रस्त राहिले. व्यापारी मनसुख हिरेन हत्या प्रकरण आणि अँटिलिया बॉम्ब प्रकरणी प्रदीप शर्मा यांनी अटकही करण्यात आली होती, त्यानंतर त्यांना जामीन मंजूर झाला होता. २०१९ मध्ये त्यांना मातोश्रीवर शिवसेनेत प्रवेश घेत नालासोपाऱ्यातून निवडणूक लढवली होती.

# कल्याण परिमंडलात १७८ कोटी वीजबिल थकबाकीच्या वसुलीचे आव्हान

## चालू बिलासह थकबाकी भरण्याचे महावितरणचे आवाहन

**कल्याण/प्रतिनिधी**




महावितरणच्या कल्याण परिमंडलात आर्थिक वर्ष संपण्यास अवघे तीन-चार कार्यालयीन दिवस उरले असतानाही वीज ग्राहकांकडे (कृषिपंप व कायमस्वरुपी वीज खंडित ग्राहक वगळून) तब्बल १७८ कोटी रुपयांच्या थकीत वीजबिल वसुलीचे आव्हान कर्मचाऱ्यांसमोर आहे. त्यामुळे थकित रकमेची वसुली अथवा थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करणे हे दोनच पर्याय त्यांच्यासमोर आहेत. संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी थकबाकीदारांनी थकीत रकमेचा तर इतर ग्राहकांनी चालू वीजबिलाचा त्वरित भरणा करावा, असे आवाहन महावितरणने केले आहे. थकबाकी वसुलीसाठी मुख्य अभियंत्यांसह जनमित्रांपर्यंत सर्वच स्तरावरील अधिकारी, अभियंते व कर्मचारी वाढत्या तापमानातही वसुलीच्या कामासाठी फिल्डवर आहेत. वीजबिल भरण्याची मूदत संपलेल्या कल्याण परिमंडलातील २ लाख ७६ हजार ९७९ ग्राहकांकडून १७६ कोटी ९७ लाख रुपयांची थकबाकी वसूल होणे बाकी आहे. कल्याण पूर्व आणि पाश्चिम तसेच डोंबिवली विभागाचा समावेश असलेल्या कल्याण मंडल कार्यालय एक अंतर्गत ४५ हजार १८१ ग्राहकांकडे १५ कोटी ३२ लाख रुपयांची थकबाकी आहे. उल्हासनगर एक आणि दोन, कल्याण ग्रामीण व बदलापूर विभागाचा समावेश असलेल्या कल्याण मंडल दोन अंतर्गत ८६ हजार ५६१ ग्राहकांकडे ६४ कोटी ८ लाख रुपयांचे वीजबिल थकित आहे. वसई व विरार विभागाचा समावेश असलेल्या वसई मंडलातील ९२ हजार ४२७ ग्राहकांकडे ४४ कोटी ९५ लाख तर पालघर मंडलातील ५२ हजार ८१० ग्राहकांकडे ४२ कोटी ४ लाख रुपयांची वीजबिल थकबाकी आहे. कल्याण परिमंडलात थकीत वीजबिलापोटी १० हजार ३९४ ग्राहकांचा वीजपुरवठा मार्चमध्ये खंडित केला आहे. मार्च अखेरपर्यंत रविवार आणि इतर सुटीच्या दिवशीही वीजबिल भरणा केंद्र सुरु ठेवण्यात येणार आहेत. याशिवाय महावितरणचे संकेतस्थळ, ग्राहकांसाठीचे मोबाईल प, विविध पेमेंट वॅलेट आदींच्या माध्यमातून डेबिट/क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग मार्फत वीजबिल ऑनलाइन भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. या सुविधांचा उपयोग करून संबंधित ग्राहकांनी थकबाकी व इतर ग्राहकांनी चालू वीजबिलाचा विहित मुदतीत भरणा करून सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

# विरार येथे यंग स्टार्स ट्रस्टच्या नृत्य स्पर्धेत युएसडी स्टार ग्रुप प्रथम

**विरार/प्रतिनिधी**



गृहिणींच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी विरारच्या यंग स्टार्स ट्रस्ट तर्फे तालुकास्तरीय एकेरी नृत्य व समूह नृत्य स्पर्धा विरार कॉलेजमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेत ९५ संघांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ७५ संघांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत युएसडी स्टार ग्रुप ने प्रथम क्रमांक पटकावला तर एकेरी नृत्य स्पर्धेत मुक्ता कविणकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. यंग स्टार ट्रस्टने जगाच्या पाठीवर इंडिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एक आगळेवेगळे उपक्रम राबवून अनोखा आदर्श निर्माण केला आहे. यंग स्टार्स ट्रस्टचे अध्यक्ष आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक अजीव पाटील यांनी महिलांनी चूल आणि मुल यामध्ये अडकून न राहता स्वतःचा छंद जोपासून त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी अनेक स्त्री आणि पुरुषांना सुद्धा एक व्यासपीठ उपलब्ध व्हावे म्हणून अनेक स्पर्धांचे आयोजन केल जात. एकेरी नृत्य स्पर्धेत मुक्ता कविणकर प्रथम, मनीषा मयेकर द्वितीय, नूतन कांबळे तृतीय क्रमांक पटकावला आहे. उत्तेजनार्थ म्हणून सोनल लोखंडे, सिद्धांती सोनावणे यांना पारितोषिक देण्यात आले तर समूह नृत्य स्पर्धेत यु एस डी स्टार ग्रुप ने प्रथम, गौरी सखी ग्रुप द्वितीय, नृत्य निधी कलाकेंद्र तृतीय तर राधाकृष्ण कलामंच, इन्स्पिरेशन ग्रुप ला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. यावेळी परीक्षक म्हणून सुबल सरकार यांचे नातू कार्तिक पॉल व रिया परब यांनी काम पाहिले. स्पर्ध्येचा बक्षीस समारंभ वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी व्यासपीठावर वसई जनता बँकेचे अध्यक्ष महेश देसाई, परिवहन समितीचे माजी सभापती कल्पक पाटील उपस्थित होते

# धारावी किल्ल्याजवळील मैदानात उभारल्या जाणाऱ्या 'हॅलीपॅड'मुळे नागरिक संतापले!

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**



उत्तनच्या जंजिरे धारावी किल्यालगत असलेल्या मोकळ्या मैदानात जिल्हाधिकारी मार्फत 'हॅलीपॅड'ची उभारणी केली जात आहे. मात्र या भागात मासळी सुखवण्यासाठी तसेच मुलांना खेळण्यासाठी ही एकमात्र जागा असल्याने यास स्थानिक नागरिकांनी कडाकून विरोध केला आहे. उत्तनच्या जंजिरे धारावी किल्याला लागून चिमाजी अप्पा मैदान आहे. पालिकेच्या विकास आराखड्यात हे मैदान किल्ले विकासासाठी आरक्षित करण्यात आले आहे. सध्या या मैदानावर स्थानिक मच्छिमार मासळी सुखावण्याचे काम करत असून उर्वरित जागेत मुल क्रिकेट खेळत असतात. दरम्यान प्रत्येक जिल्हात सात ते आठ 'हॅलीपॅड'ची उभारणी करण्याचे आदेश शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यानुसार भाईंदरमध्ये हेलिपॅड उभारण्यासाठी पश्चिम येथील सुभाष चंद्र भोस मैदानाची निवड करण्यात आली होती. मात्र यास विरोध झाल्यानंतर हे हेलिपॅड उत्तनच्या चिमाजी अप्पा मैदानात उभारण्याचे ठरवण्यात आले. यासाठी स्थानिक तहसीलदारांमार्फत स्थळ पाहणी करून राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाला कामाचे कंत्राट देण्यात आले आहे. मात्र यामुळे मैदान नष्ट होणार असल्याचे आरोप करत स्थानिक नागरिकांनी याविरोधात आंदोलन पुकारले आहे. यावरून गुरुवारी आमदार प्रताप सरनाईक यांनी मैदानाला भेट देऊन काम रद्द करण्याची मागणी फोनवरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांस कडे केली आहे. तर याबाबत मुख्यमंत्र्यांनी देखील जिल्हाधिकाऱ्यांना हॅलीपॅड स्थलांतरीत करण्याचे सांगितले असल्याचा दावा सरनाईक यांनी केला आहे. उत्तन येथील चिमाजी अप्पा मैदानाची जागा ही शासकीय आहे. त्यामुळे या ठिकाणी राज्य सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हॅलीपॅड उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र आता स्थानिक नागरिकांनी विरोध केल्यामुळे निर्णयाचा फेरविचार केला जाईल, मिरा भाईंदर अप्पर तहसीलदार दिनेश गौंड यांनी सांगितले.

# तोतया पोलिसांनी अंगाडियांना अडवून साडे पाच कोटींची रोकड केली लंपास!




**विरार/प्रतिनिधी**

नकली पोलीस बनून आलेल्या पाच जणांनी महामार्गावरून जाणाऱ्या अंगाडियांना अडवून त्यांच्याकडील साडेपाच कोटींची रोकड लंपास केली आहे. याप्रकरणी गुन्हे शाखा ३ च्या पथकाने अंगाडियाच्या चालकासह तीन जणांना ताब्यात घेतले आहे. मुंबईच्या काळबादेवी येथे राहणारे श्रावण ठाकूर (२४) हे अंगाडिया चालक बाबू स्वामी आणि अक्षय ठाकूर हे चारचाकी गाडीने गुजरातला निघाले होते. रात्री ९ च्या सुमारास डोळ्यावर झोप येत असल्याने त्यांनी विरारच्या खानिवडे टोल नाक्याजवळ येऊन गाडी तोंड धुवण्यासाठी थांबवली होती. याच दरम्यान, त्यांच्या मागून आलेल्या एका वाहनातून ५ जण उतरले. त्यांनी आपली ओळख पोलीस असल्याची करून दिली आणि त्यांच्या वाहनात असलेल्या रोकड बाबत चौकशी केली. यानंतर त्यांनी चालक बाबू स्वामी आणि अक्षय ठाकूर यांना आपल्या वाहनात बसवून नेले तर फिर्यादी यांच्या कडील रोकड असलेली बॅग, मोबाईल फोन काढून घेतला. चालक आणि अक्षय ठाकूर याला काही अंतरावर सोडून दिले. या प्रकरणी मांडवी पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४१९, ३४१ आणि ३४ नुसार तोतयागिरी आणि फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. अंगाडियाचा चालकासह ४ जण ताब्यात या प्रकरणी गुन्हे शाखा ३ च्या पथकाने अंगाडियाचा चालक बाबू स्वामी याच्यासह तीन जणांना ताब्यात घेतले आहे. रोकड घेऊन जाणार असल्याची माहिती दिल्याचा त्याच्यावर संशय आहे. योजनेनुसार चालकाने गाडी थांबवली आणि तोतया पोलिसांनी येऊन रोकड लुटून नेली असावी असे पोलिसांनी सांगितले.

# ठाण्यात इलेक्ट्रीक दुचाकीच्या बॅटरीचा स्फोट; तीन जण जखमी

**ठाणे/प्रतिनिधी**



कळवा येथील मफतलाल कंपनी परिसरात बुधवारी इलेक्ट्रीक दुचाकीच्या बॅटरीचा स्फोट झाल्याने घराची भिंत कोसळून तीन जण जखमी झाले. कुसुमदेवी विश्वनाथ गुप्ता (२८), लाल बादशाह (६६) आणि मेहबूबी लाल बादशहा (५६) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यापूर्वी देखील इलेक्ट्रीक दुचाकीच्या बॅटरींचा स्फोट झाल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे वाहन चालकांच्या सुरक्षेविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. मफतलाल कंपनी परिसरात शांतीनगर लोकवस्ती आहे. या लोकवस्तीमध्ये विश्वनाथ गुप्ता वास्तव्यास असून त्यांचे वाहन दुरुस्तीचा व्यवसाय आहे. त्यांनी एका इलेक्ट्रीक दुचाकीची बॅटरी घराच्या पोटमाळ्यामध्ये ठेवली होती. मंगळवारी रात्री ११.३० वाजताच्या सुमारास या बॅटरीचा स्फोट झाला. हा स्फोट इतका मोठा होता की, घराची भिंत कोसळली. त्यामुळे विश्वनाथ यांची पत्नी कुसुमदेवी या घटनेत जखमी झाल्या. तसेच शेजारी राहणारे लाल बादशाह आणि मेहबूबी हे देखील जखमी झाले. घटनेची माहिती नागरिकांना मिळाल्यानंतर त्यांनी तात्काळ ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाला संपर्क साधला. जखमींवर छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# घाटकोपरमध्ये सापडली लाखो रुपयांची रोकड

**मुंबई/प्रतिनिधी**



देशात आचारसंहिता लागू झाली आहे.त्यामुळे पोलिस आणि निवडणूक अधिकारी सतर्क झाले आहेत. अशातच मुंबई उपनगरमध्ये घाटकोपर परिसरात लाखो रुपयांची रोकड सापडली आहे. जवपास ७० लाख रुपयांची ही रोकड आहे. निवडणूक अधिकारी आणि आयकर अधिकारी तपास करत आहेत. मंगळवारी रात्री पंतनगर पोलिसांनी गस्त घालत असताना एक संशियत कार थांबवली. या कारची तपासणी केली असता. या कारमध्ये पोलिसांना सत्तर लाख रुपयांची रोकड आढळली. काल रात्री पासून निवडणूक अधिकारी आणि आयकर विभाग याचा तपास करीत आहे. जे वाहन पोलिसांनी पकडले त्यात दिलीप नाथानी, अतुल नाथानी हे दोन व्यक्ती बसलेले होते. रोकड हस्तगत करत पोलिसांनी दोघांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. इन्कमटॅक्स सल्लागार असल्याचे दोघांनी चौकशी दरम्यान पोलिसांना सांगितले. पंतनगर पोलिसांसह निवडणूक अधिकारी आणि आयकर विभागाचे अधिकारी त्यांची चौकशी करत आहेत. हे पैसे कोणाचे आहेत आणि कशासाठी नेले जात होते? याचा पोलीस तपास करीत आहेत. मात्र पोलीस व निवडणूक अधिकाऱ्यांनी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे. दरम्यान पुणे महानगरपालिकेकडून अंदाजपत्रक जाहीर करण्यात आलं. आचारसंहिता लागण्यापूर्वी तब्बल ३०० कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली. रस्ते, पाणीपुरवठ्याची कामे केली जाणारेत. कामं सुरू करण्याची परवानगी देण्यात आली असून, कामात उदासीनता दिसून आल्यास थेट कारवाई केली जाईल, असा इशारा अतिरिक्त आयुक्तांनी दिलाय. छ. संभाजीनगरमध्ये आदर्श आचारसंहिता लागू झालीये. या पार्श्वभूमीवर निवडणुका होईपर्यंत शासकीय कार्यालय परिसरात आंदोलन, उपोषण, मोर्चे, निदर्शने, घेराव यावर निर्बंध घालण्यात आलेत. तसंच याचं उल्लंघन केल्यास फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिलाय.



**मराठा सेवा संघाचे दिवंगत कार्यकर्ते तथा पत्रकार स्वर्गीय गोविंद निकम यांचे सुपुत्र ज्ञानेश्वर गोविंद निकम यांची सांख्यिकी विभाग विस्तार अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करून शुभेच्छा देताना पंचायत समितीचे वरिष्ठ लिपिक हरिभाऊ शिंदे सामाजिक कार्यकर्ते राम कांबळे पत्रकार शिवाजी मोरे बालाजी उबाळे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.**

# पालघरमध्ये २५ एकर जागेत बनणार अत्याधुनिक मध्यवर्ती कारागृह

**पालघर/प्रतिनिधी**



राज्यातील विविध कारांगृहात, शिक्षा झालेल्या आणि गंभीर गुन्हे दाखल असलेल्या कारागृहात कैद्यांची गर्दी होत असून त्यामुळे कैद्यांना ठेवण्यासाठी जागा अपुरी पडत आहे. राज्यात नवीन कारागृह बांधण्यासाठी तीन वर्षांपूर्वी मंजुरी दिलेल्या पालघर जिल्ह्यात कारागृह उभारण्यासाठी नुकताच ६३० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. उमरोळी येथील जागा मध्यवर्ती कारागृहासाठी निश्चित करण्यात आली आहे. पालघर जिल्ह्यातील पाचशेहून अधिक कैदी ठाणे आणि तळोजा येथील कारागृहात ठेवण्यात आले आहेत. सुनावणीसाठी न्यायालयात त्यांची ने-आण करण्यासाठी पोलिसांना अनुक्रमे १०० ते १५० किलोमीटरचा प्रवास करावा लागतो. त्यासाठी पोलिसांचे अतिरिक्त मनुष्यबळ लागत असून कैद्यांना न्यायालयात आणण्यासाठी सुरक्षेच्या दृष्टीने त्रासदायक ठरत आहे. मध्यवर्ती कारागृह उभारण्यासाठी पालघर जिल्ह्याच्या निर्मितीपासून प्रयत्न सुरू असून त्या प्रयत्नांना आता यश आले आहे. पालघरजवळील उमरोळी येथील सरकारच्या अख्यातरित असलेली सर्वे क्रमांक ३०८ मधील सुमारे २३० एकर जागेपैकी मध्यवर्ती कारागृहासाठी २५ एकर जागा निश्चित करण्यात येऊन ती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून तुरुंग प्रशासनाकडे हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. पालघर जिल्ह्यात पश्चिम रेल्वेवरील उमरोळी रेल्वेस्थानकाजवळ कारागृह उभारण्यात येईल, अशी घोषणा तीन वर्षांपूर्वी सरकारने केली होती. त्यासाठी २५ एकर जमीन उमरोळी येथे मंजूरही केली. परंतु त्यासाठी निधी उपलब्ध न करून दिल्याने या कारागृहाचा प्रश्न प्रलंबित होता.

# वसईत जलवाहिनी फुटल्याने पाणीटंचाई

**वसई/प्रतिनिधी**

वसई पश्चिमेतील ओमनगर येथील ७०० मिमी व्यासाची जलवाहिनी मंगळवारी (ता. १९) फुटली. तसेच वसई पूर्व उड्डाणपुलाजवळ ३५० मिमी व्यासाच्या जलवाहिनीला गळती झाल्याने वसई, विरारमध्ये पाणीटंचाईची समस्या वाढली होती. वसई पूर्वेकडील समर्थ रामदास नगर, दिवाण परिसर, डोंगरी, संभाजीनगर, आझाद नगर, संत जलाराम बापू नगर, औद्योगिक व महावितरण वसाहतीत पाणीपुरवठा बंद करण्यात आला होता. तसेच संपूर्ण वसई पश्चिमेकडील पाणीपुरवठा बंद करण्यात आला. जलवाहिनीला भगदाड पडल्याचे समजताच दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले. त्यामुळे नागरिकांना पाणीटंचाई जाणवली.

# हुकूमशाहांचे काऊंटडाऊन सुरू

हुकूमशाही आणि हुकूम शहा फार काळ टिकत नाहीत. त्यांचा अंत ठरलेला असतो.आणि त्यांचा अंत जसा जसा जवळ येतो, तशी तशी त्यांची फडफड वाढते.दिवा जसा विझन्यापूर्वी फडफडतो, अगदी तशीच परिस्थिती हुकूम शांची झालेली असते. मग तो चगेज खान असो. अल्लवुद्दिन खिलजी असो,औरंगजेब असो, की हिटलर, मुसोलिनी, सद्दाम हुसेन, गडाफी असो या सर्व हुकूमशहा लोकांचा भयंकर शेवट झाला होता आणि हा जगाचा इतिहास आहे .ज्यांनी दुसऱ्याचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला, त्याचा आवाज साक्षात नियतिने बंद केला. ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे भारतात सध्या जे काही चाललेल आहे, त्याचाही असाच शेवट होणार आहे. लोकशाहीच्या नावाने राज्य करायचे, आणि हुकूमशासारखे वागायचे, लोकांचे आवाज दाबन्याचा प्रयत्न करायचा, विरोधकांना खोट्या नाट्य प्रकरणात तुरुंगात डाबायचे हा सगळा संतापजनक प्रकार फार काळ चालणार नाही. कारण आजकाल लोकांना सर्व काही समजते. कोण चांगला, कोण वाईट, कोणामुळे देशाला धोका आहे, कोण देशासाठी फायदेशीर आहे, याची लोकांना पूर्णपणे जाणीव आहे. आणि म्हणूनच यंदाच्या लोकसभा निवडणुकीत लोक एक चांगला निर्णय घेण्याच्या तयारीत आहेत. आज-काल केंद्रात बहुमताचे सरकार असल्यामुळे, त्या सरकारने तपास यंत्रणांचा ज्या पद्धतीने दुरुपयोग सुरू केला आहे, तो फार काळ चालणार नाही. आतापर्यंत भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली विरोधी पक्षातल्या अनेक नेत्यांना तुरुंगात डांबण्यात आले. जे लोक भीतीने सत्ताधाऱ्यांना सिरेंडर झाले, त्यांना सत्ताधाऱ्यांनी आपल्या पक्षात घेतले. आणि वॉशिंग मशीन मध्ये घालून धुवून स्वच्छ केले. आजही भाजपात गेलेले असे कितीतरी भ्रष्ट नेते स्वच्छ बनून उजळ माथ्याने बाहेर फिरत आहेत. हे सगळे एवढ्यासाठी सांगायचं आहे की नुकतीच दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अबकारी घोटाळ्याप्रकरणी अटक करण्यात आली. अरविंद केजरीवाल हे स्वतः एक उत्कृष्ट असे प्रशासकीय अधिकारी होते. त्यामुळे त्यांना कायद्याची पूर्ण जाण आहे. म्हणूनच तर ते ईडीच्या समन्सला भीक घालत नव्हते. नऊ समन्स येऊनही ते ईडीसमोर हजर झाले नाहीत. म्हणून त्यांना अखेर गाफील ठेवून अटक करण्यात आली. असे देशवासीयांचे म्हणणे आहे. जर केजरीवाल इतर नेत्यांप्रमाणे भाजपला सिरेंडर झाले असते, तर त्यांच्यावरील कारवाई झाली नसती. परंतु केजरीवाल हे अण्णांच्या आंदोलनातून पुढे आलेले जिगरबाज नेते आहेत. त्यामुळे ते सरकारसमोर झुकणार नाहीत. उलट त्यांनी यापूर्वी सरकारला झुकायला लावले. दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत दोन वेळा केजरीवालनी भाजपला आसमान दाखवले. मोदींनी अनेक ठिकाणी प्रचार करूनही केजरीवालांनी भाजपला विधानसभेच्या दहा जागाही मिळू दिल्या नाहीत. याचाच अर्थ मोदींपेक्षा केजरीवाल कितीतरी पटीने हिकमती आहेत. त्यांना भलेही आज तुरुंगात डाबले असले, तरी ते घाबरणारे नाहीत. उलट त्यांच्या अटकेमुळे आगामी लोकसभा निवडणुकीत विरोधकांची बाजू आणखी मजबूत झाली आहे. कारण केंद्रातील भाजपा सरकार विरोधकांवर कशाप्रकारे अन्याय करीत आहे, हे देशातील १४० कोटी जनतेने पाहिले आहे. त्यामुळे केसरीवाल यांची अटक म्हणजेच भाजपाचे काउंटडाऊन हे आता निश्चित झाले आहे. ज्या मद्य घोटाळ्याबाबत केसरीवालना अटक झाली, तो मद्य घोटाळा जेमतेम सहाशे कोटींचा आहे. अर्थात घोटाळा एक रुपयाचा असो की एक हजार कोटींचा असो, घोटाळा हा घोटाळा असतो. जर केजरीवाल आणि त्यांच्या पक्षाने खरोखरच अवकारी धोरणामध्ये काही घोटाळा केला असेल आणि दारू माफियांना फायदा पोहोचवला असेल, तर त्यांच्यावर कारवाई व्हायलाच पाहिजे. परंतु ज्या ज्या वेळेला तपास यंत्रणांनी आम आदमी पक्षाच्या नेत्यांच्या घरावर धाडी टाकल्या त्या त्या वेळी त्यांच्या हाती काहीही लागले नाही. आताही केजरीवाल यांच्या घरावर ईडीने धाड टाकली तेव्हा त्यांच्या घरात फार काही सापडले नाही. उलाट ईडीच्या काही अधिकाऱ्यांच्या फायली केजरीवाल्यांच्या घरात सापडल्या. याचाच अर्थ ईडीच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या विरोधात केसरीवाल माहिती गोळा करीत होते. आणि ही माहिती जर सार्वजनिक झाली असती, तर ईडीचेही झोलझपाटे लोकांसमोर आले असते. त्यामुळे आता ईडी केजरीवाल यांच्यावर अत्यंत सूडबुद्धीने कारवाई करणार त्यासाठीच त्यांनी न्यायालयाकडे केजरीवाल्यांचा दहा दिवसांचा रिमांड मागितला होता. परंतु न्यायालयाने त्यांना फक्त सहा दिवसांची कोठडी दिली आहे. या सहा दिवसांमध्ये केजरीवालना दारू घोटाळ्यातील इतर आरोपींच्या समोरासमोर बसून चौकशी केली जाईल आणि त्यात जर काही निष्पन्न निघाले. तर कारवाई होऊ शकते. या दारू घोटाळ्यात केसीआर यांची कन्या कविता यांना अटक झाली आहे. तसेच इतरही काही लोकांना अटक झालेली आहे आता त्या सर्वांची जबानीचा वापर करून केजरीवाल यांच्या विरोधात भक्कम पुरावे म्हणून गोळा केले जातील. आणि केजरीवालना बळीचा बकरा बनवला जाईल. ६०० कोटींचा घोटाळा म्हणजे काही फार मोठा घोटाळा नाही. याउलट महाराष्ट्रातील शिखर बँकेत २५ हजार कोटींचा घोटाळा झाला होता तर सिंचनात ७० हजार कोटींचा घोटाळा झाला होता. या दोन्ही घोटाळ्यात प्रमुख आरोपी असलेला अजित पवार आज महाराष्ट्र सरकार मध्ये उपमुख्यमंत्री आहे. मोदींची हीच का भ्रष्टाचार विरोधी मोहीम? म्हणजे जे मोठे घोटाळेबाज आहेत त्यांना आपल्या सोबत घ्यायचे आणि जे त्यांच्यासाठी डोकेदुखी ठरणारे आहेत त्यांना कुठल्या ना कुठल्या खोट्या मॅटरमध्ये अडकवून त्यांचे तोंड बंद करायचे. हा सगळा प्रकार संताप जनक आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत मोदी आणि त्यांच्या पक्षाला या सगळ्याचा जाब द्यावा लागणार आहे. कारण या देशातले सगळेच लोक काही अंधभक्त नाहीत. त्यामुळे जे लोक चौकसपणे राजकारणाकडे बघतात, जे लोक केजरीवाल यांच्या अटेकडे सकारात्मक दृष्टीने बघतात. ते लोक या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना धडा शिकवल्याशिवाय राहणार नाहीत .घोटाळेबाजांवर कारवाई जरूर करा. पण ही कारवाई करताना केवळ विरोधकांना टार्गेट करू नका. सत्ताधारी पक्षातील घोटाळे बाजांवर सुधा कारवाई करा. एवढेच या देशातील जनतेचे म्हणणं आहे .परंतु तसे न करता बाहेरून आलेल्या घोटाळेबाजांना राज आश्रय द्यायचा. आणि जे विरोधात आहेत त्यांना अडकवायचे. त्यांच्यामागे तपास यंत्रणांचा सासेमीरा लावायचा हा कुठला न्याय? आगामी लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडी मजबूतपणे एनडीएच्या समोर उभी रहात आहे आणि केजरीवाल हे इंडिया आघाडीचे एक महत्त्वाचे नेते आहेत. म्हणूनच केसरीवालना ईडीच्या चक्रव्युहात अडकून अटक करण्यात आली आहे. पण केजरीवाल यांना जरी अटक झाली, तरी विरोधी पक्षाचे इतर अनेक नेते अजून बाहेर आहेत. शिवाय केजरीवालना झालेल्या अटकेचे तीव्र पडसाद देशभर उमटलेले आहेत. त्यामुळे सत्ताधाऱ्यांचे आतापासूनच काउंट डाऊन सुरू झालेले आहे. चारशे पार तर सोडाच १०० जागा मिळणे ही कठीण आहे. म्हणूनच केंद्राकडून विरोधी पक्षाच्या नेत्या विरुद्ध सूडबुद्धीने कारवाई केली जात आहे.पण या सुडाच्या राजकारणाचे तीव्र पडसाद उमटल्याशिवय रहाणार नाहीत. केजरीवाल यांनी आपल्या दोन टर्म मध्ये खूप चांगले काम केलेले होते. वीज दरात सवलत दिली होती. पाणी, आरोग्य, शिक्षण यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये चांगले काम केले होते. त्यांच्या शैक्षणिक कार्याचा तर जगभर गौरव करण्यात आला होता. म्हणून तर संपूर्ण दिल्ली त्यांच्या पाठीशी उभी होती. मोदींच्या महिम्याचा काडीचाही परिणाम दिल्लीकरांच्या मनावर झालेला नव्हता. आणि यापुढे सुद्धा होणार नाही. कारण दिल्लीकर जितके चांगले मोदींना ओळखतात इतके कोणीही ओळखत नसतील. म्हणून तर त्यांनी भाजपला दिल्लीपासून दूर ठेवले. याबद्दल दिल्लीकरांचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. आताही केजरीवाल्च्या अटकेनंतर दिल्लीकर रस्त्यावर उतरले आहेत. भाजपच्या विरोधात, केंद्र सरकारच्या विरोधात, मोदींच्या विरोधात, आक्रोश करीत आहेत. हा आक्रोश आगामी लोकसभा निवडणुकीत वाया जाणार नाही. याची केवळ दिल्लीकरणास नव्हे तर संपूर्ण देशवासीयांना खात्री आहे.

## आयटीआय वाडा आणि सेंट गोबैन जिप्रॉक मुंबई यांच्यात सामंजस्य करार

वाडा/प्रतिनिधी

ग्रामीण भागातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,वाडा,जिल्हा पालघर आणि सेंट गोबेन जिप्रोक बिझनेस, मुंबई यांच्यात बांधकाम क्षेत्र विभागाचा एक भाग असलेला 'ड्राय वॉल आणि फॉल्स सीलिंग' हा व्यवसाय शिकवणे बाबत नुकताच गुरुवारी (दि.२१ मार्च) कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थींच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यांत आला आहे. याकरितां सेंट गोबेन जिप्रोक बिझनेस मुंबई कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक सुदीप कोलते हे औ.प्र.संस्था, वाडा येथे उपस्थित होते. या करारांतर्गत सेंट गोबैन कंपनी ही आय.टी.आय. वाडा येथे प्रशिक्षण देणेंकरितां आवश्यक त्या अद्यायावत् कार्यशाळेची निर्मिती करून देणार आहे. तसेच प्रशिक्षण कालावधीत लागणारा कच्चा माल, आवश्यक हत्यारे,अवजारें आणि संबंधित उपकरणे आणि सैद्धांतिक व प्रात्यक्षिक अभ्यासक्रमा संदर्भातील क्रमिक पुस्तकें हे उपलब्ध करून देणार आहेत. प्रशिक्षणाची जबाबदारी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील निदेशक शिक्षकांवरती असेल. या निदेशक शिक्षकांचे या व्यवसायातील अतिरिक्त प्रशिक्षित प्रशिक्षण हे सेंट गोबैन कंपनी यांच्यामार्फत करून दिले जाणार आहे. या व्यवसायामध्ये उत्तम व यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या सर्वच उमेदवारांना भविष्यातील काम देण्याची जबाबदारी सेंट गोबैन कंपनी घेणार आहे.



'ड्राय वॉल आणि फॉलस् सीलिंग' सध्या हा बांधकाम व्यवसाया मधील मोठा वाढतां प्रगत व्यवसाय असून बांधकाम क्षेत्रातील व्यवसायासोबतच या व्यवसायाला वार्षिक १२ ते १५ टक्के वाढ आहे. घराला वापरण्यात येणारे जीप्सम् बोर्डस् चा मुख्यत्वें करून वापर येथे केला जातो. वाडा येथील प्रशिक्षण केंद्रामध्ये विविध स्तरातील उमेदवारांना येथे प्रशिक्षण देण्यांत येईल. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील फिटर, वेल्डर, इलेक्ट्रिशियन, वायरमन, मेसन, पेंटर, इंटेरियर डेकोरेटर, प्लंबर, वूडवर्क टेक्निशियन इत्यादी व्यवसायातील प्रशिक्षणार्थ्यांनाही हे संलग्न प्रशिक्षण उपयोगी आणि उपयुक्त ठरेल. 'ड्राय वॉल आणि फॉल्स सीलिंग' हा व्यवसाय अभ्यासक्रम शिकवणारे वाडा केंद्र हे महाराष्ट्रातील पहिले केंद्र असेल आणि शासकीय संस्थांमधील भारतातील पहिले केंद्र असेल. अभ्यासक्रम शिकणे करितां अगदी पाचवी पास उमेदवारही येथे प्रवेश घेऊ शकतील. वयाची आणि किमान शिक्षणाची अट नसल्याने परिसरातील विविध स्तरातील उमेदवार हे व्यवसाय प्रशिक्षण घेऊन उत्तम प्रकारचे काम करू शकतील. आतापर्यंत सेंट गोबैन मार्फत देशात १५०० उमेदवारांना प्रशिक्षित केले गेले असून सर्वांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. यातील ५२ उमेदवार हे 'उत्तम उद्योजक' बनून पुर्ण वेळ हा व्यवसाय करीत असून त्यांची काहीं वार्षिक सहा कोटी रुपयांपर्यंतची उलाढाल करित आहेत. भविष्यात या प्रशिक्षित उमेदवारांना युरोपीय देशांमध्येही कामाची उत्तम संधी उपलब्ध करून देणेंबाबत उच्चस्तरीय चर्चा चालू आहेत, अशी माहिती या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक सुदीप कोलते यांनी करून दिली. तसेच औ.प्र.संस्था वाडा या संस्थेने घेतलेल्या सकारात्मक पुढाकाराबाबत त्यांनी समाधान व आनंदही व्यक्त केला आहे. सेंट गोबैन सारख्या साडेतीनशे वर्षापूर्वी स्थापन झालेल्या फ्रेंच ग्रुपने पालघर जिल्यातील आय.टी.आय.वाडा सारख्या संस्थेत रुची दाखवून प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याची तयारी दाखवली, याबद्दल त्यांचे संस्थेच्या वतीने आभार व्यक्त करण्यांत आले आहेत. या केंद्रातून जिल्ह्यातील आदिवासी, बेरोजगार, वंचित तरुण-तरुणींना एक नवीन बांधकाम व्यवसायात उतरण्याची संधी मिळावी याकरितां व्यक्तिशः आपण लक्ष घालून हा करार केला आहे असे संस्थेचे प्राचार्य रोहन प्र.चुंबळे. यांनी सांगितले. तसेच हा 'सामंजस्य करार' करणे करितां वेळोवेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केलेल्या सुयोग्य मार्गदर्शनाबद्दल महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयचे संचालक, तसेच सहसंचालक, उपसंचालक, कक्ष अधिकारी यांचे या सामंजस्य कराराच्या माध्यमातून या भागातील युवकांसाठी रोजगार निर्मितीची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल सेंट ग्लौबेन कंपनी व आय.टी.आय. वाडा संस्थेच्या वतीने संयुक्तरित्या आभारही व्यक्त करण्यांत आले आहेत. तथापि, संबंधितांनी अधिक माहितीसाठी संस्थेस संपर्क साधण्याचे आवाहनही संस्थेच्या प्राचार्याच्या वतीने करण्यांत आले आहे.

## भरारी पथके आणि चेक पोस्टच्या माध्यमातून आदर्श आचारसंहितेची कठोर अंमलबजावणी करा -जिल्हाधिकारी

लातूर/प्रतिनिधी

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता जिल्ह्यात लागू असून या आचारसंहितेची अंमलबजावणी करण्यासाठी भरारी पथके, चेक पोस्ट स्थापन करण्यात आले आहेत. याकरिता नियुक्त सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी सतर्क राहून काम करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे केल्या. आदर्श आचारसंहिता कक्ष आणि सी व्हिजील प, मतदान केंद्रांवरील कायदा व सुव्यवस्था यासह निवडणूक आयोगामार्फत कार्यान्वित विविध पच्या अनुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. आदर्श आचारसंहिता कक्षाचे प्रमुख तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, संगीता टकले यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्यासह नोडल अधिकारी यावेळी उपस्थित होते.



भरारी पथकांनी आपल्या कार्यक्षेत्रात कोणत्या ठिकाणी आदर्श आचारसंहितेचा भंग होत असल्यास किंवा कोणताही गैरप्रकार होत असल्यास त्याची तातडीने दखल घेवून भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही करावी. तसेच चेक पोस्टवर तैनात करण्यात आलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी वाहनांची तपासणी करून रोकड, मद्य यासह इतर प्रतिबंधित बाबींची वाहतूक होणार नाही, याची काळजी घ्यावी. या कामामध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा करू नये, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. राजकीय पक्ष, उमेदवारांना सभा, प्रचारासाठी विविध परवानग्या घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे, परवानगीची पद्धत याबाबत सर्व राजकीय पक्ष प्रतिनिधींना माहिती देण्यात यावी. तसेच निवडणूक आयोगाने विकसित केलेल्या विविध पच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी प्रत्येक उपविभागीय अधिकारी यांनी आपले स्तरावर स्वतंत्र नोडल अधिकारी नेमण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. तसेच सी-व्हिजील पवर प्राप्त होणाऱ्या आदर्श आचारसंहिता भंगाच्या तक्रारीवर १०० मिनिटात कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास संबंधित भरारी पथक, चेकपोस्ट वरील अधिकाऱ्यांनी संबंधितांवर गुन्हा दाखल करून त्याबाबतचा अहवाल आपल्या नोडल अधिकाऱ्यांना द्यावा, असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. कदम यांनी सांगितले.

## 'सिमी' बेकायदेशीर संघटना केंद्र शासनाकडून घोषित

लातूर/प्रतिनिधी

केंद्र शासनाने २९ जानेवारी २०२४ काढलेल्या एस.ओ. ३५४ (इ) या अधिसूचनेनुसार स्टुडंट्स इस्लामिक मुव्हमेंट ऑफ इंडिया (सिमी) या संघटनेला बेकायदेशीर संघटना म्हणून घोषित केले आहे. बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम १९६७ कायद्याच्या कलम ३ च्या उप कलम (१) द्वारे ही कारवाई करण्यात आली आहे. याबाबत बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंधक) न्यायाधिकरण समोर सुनावणी सुरु असून २९ फेब्रुवारी २०२४ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये 'सिमी' संघटनेला बेकायदेशीर संघटना का घोषित केले जावू नये, याबाबत सिमी संघटनेला कारणे दाखवा नोटीस बजाविण्याचे आदेश न्यायाधिकरणाने दिले आहेत. 'सिमी' संघटनेच्या कार्यालयाला अधिसूचनेची प्रत लावणे, शक्य असेल तिथे पदाधिकाऱ्यांना नोटीस देणे, नोंदणीकृत पोस्ट अथवा स्पीड पोस्ट अथवा कुरियरद्वारे देखील नोटीस पाठविणे, संघटनेचे कार्यक्षेत्र असलेल्या भागात लाऊडस्पीकरद्वारे घोषणा करणे, रेडिओ, दूरदर्शनवर घोषणा करणे, प्रसारमाध्यमातून नोटीस प्रसिद्ध करण्याची कार्यवाही करण्याचे न्यायाधिकरणाने आदेशित केले आहे. या अनुषंगाने न्यायाधिकरणाची पुढील सुनावणी ९ एप्रिल २०२४ रोजी कोर्ट रूम नं. १६, दिल्ली हायकोर्ट, शेर खान रोड, नवी दिल्ली येथे होणार आहे.

## ग्रामीण रुग्णांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी इंटराईज कंपनीच्या सीएसआर फंडद्वारे मदतीचा हात

### पडघा प्राथमिक आरोग्य केंद्रास २५ लाख रुपये किंमतीची विविध वस्तूंची मदत

भिवंडी/प्रतिनिधी

ठाणे ग्रामीण भागातील ग्रामस्थांच्या आरोग्याची काळजी व्यवस्थित व्हावी यासाठी इंटराईज कंपनीच्या सीएसआर फंड द्वारे मेकिंग द डिफरन्स संस्थेच्या मदतीतून संजीवनी प्रकल्पाद्वारे प्राथमिक आरोग्य केंद्र पडघा, ता. भिवंडी येथे ४१ प्रकारचे विविध वस्तू देण्यात आले आहे. आज जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे यांच्या शुभहस्ते उद्घाटन सोहळा संपन्न झाला. रुग्णांना फायदा होईल अशा अत्यावश्यक वस्तू इंटराईज कंपनीच्या फंडच्या माध्यमातून देण्यात आले असून प्राथमिक आरोग्य केंद्रांतील लोकसंख्या पाहता ६४ हजार २७५ इतकी आहे. या प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत ४७ गावांचा, २३ पाडे व २२ ग्रामपंचायतींचा समावेश होतो. या सर्व ग्रामस्थांच्या आरोग्यासाठी विविध सोईसुविधा वेळोवेळी पुरविणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. ही गरज लक्षात घेता मेकिंग द डिफरन्स संस्थेमार्फत २५ लाख रुपयांचे विविध वस्तू दिल्या बद्दल मी आभार मानते. अशा प्रकारे शासकीय आरोग्य केंद्रांची प्रगती होण्यासाठी इतर संस्थांनी देखील पुढाकार घ्यावा असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे यांनी केले.



मी अपघातात माझ्या जवळच्या लोकांना गमावले आहे. आज त्यांची आठवण येते. वेळेत उपचार मिळण्यासाठी आम्ही तेव्हा खूप प्रयत्न केले पण उपयोग झाला नाही. आज कोणत्याही रुग्णांना वेळेत उपचार मिळावे आणि जगण्यासाठी परत नव आयुष्य मिळावे यासाठी मी काम हाती घेतले. यापुढे देखील आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जोमाने काम करण्यात येईल असे आश्वासन इंटराईज कंपनीचे प्रमुख पवन कांत यांनी दिले. सदर आरोग्य केंद्र येथे नाशिक महामार्ग जवळ असल्याने अपघात होण्याची शक्यता जास्त असल्याने अतिसंवेदनशील प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. सर्प दंश, अपघात, प्रसूती अशा आरोग्य सेवा पुरवण्यासाठी विविध आवश्यक वस्तुची गरज प्राथमिक आरोग्य केंद्रांना असते. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात लोकांचे आरोग्य सेवा सुधारण्यासाठी इतर संस्थांनी देखील पुढे यावे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी सांगितले. प्राथमिक आरोग्य केंद्रात दिलेल्या विविध उपयोगी वस्तू मल्टीपॅरा मॉनिटर, आयसीयु बेड, स्ट्रेचर, बेबी वॉर्मर, संगणक, टेबल, खुर्ची, मेडीसीन ट्रॉली, एअर कंडिशनर, फंक्शन बेड अशा एकूण ४१ वस्तू प्राथमिक आरोग्य केंद्रात दिल्या आहे. यावेळी गटविकास अधिकारी पंचायत समिती भिवंडी प्रदिप घोरपडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. माधव वाघमारे, इंटराईज प्रोजेक्टचे प्रमुख पवन कांत, प्रकल्प प्रमुख पुष्कर प्रियदर्शनी, सहाय्यक व्यवस्थापक मंगेश रुगाले, अध्यक्ष संस्थापक दिपक विश्वकर्मा, समन्वयक प्रदिप विश्वकर्मा, संजीवनीचे प्रकल्प प्रमुख आरती पाटवा तसेच पडघा प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी उपस्थित होते.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

25 TO 31 MARCH 2024 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 3/23/2024 8:40 PM Page 1



# डहाणू पंचायत समितीची प्रशासकीय इमारत धोकादायक




**डहाणू/प्रतिनिधी**

डहाणू पंचायत समितीची प्रशासकीय इमारत जीर्ण झाल्याने ती वापरण्यास अयोग्य आहे. तसेच जीविताला धोकादायक असल्याचे स्ट्रक्चरल ऑडिटमधून स्पष्ट झाले आहे. त्यानंतर ही इमारत रिकामी करण्याचा पंचायत समिती प्रशासनाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे अधिकारी आणि कर्मचारीवर्गाने सुटकेचा नि:श्वास टाकला. डहाणू पंचायत समितीने इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना पाठवला होता; परंतु निधीचे कारण देत, पंचायत समितीला स्ट्रक्चरल ऑडिट करून घेण्यासाठी सांगितले होते. तसेच सरकारमान्य वसईतील कंपनीकडून जानेवारीच्या अखेरीस ही प्रक्रिया पूर्णत्वास आली, त्यासाठी सेस फंडाचा निधी वापरण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. दरम्यान फेब्रुवारीच्या दुसऱ्या पंधरवड्यात इमारत जीर्ण होऊन ती वापरण्यासाठी अयोग्य असल्याचा अहवाल प्राप्त झाला होता. त्यानुसार डहाणू पंचायत समिती प्रशासनाकडून इमारत रिकामी करण्याची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. १९६५ मध्ये लोडबेअरिंग पद्धतीने बांधलेल्या इमारतीचा तळ व पहिला मजला अशी बांधणी असून छप्पर आरसीसी स्लॅबचे आहे. इमारत रिकामी करून विविध विभागांचे कामकाज सुरू करण्यासाठी मूळ इमारतीच्या पाठीमागे कर्मचारी निवासस्थानांच्या खोल्या वापरल्या जाणार आहेत. इमारत निर्खेलन प्रस्ताव जिल्हा कार्यालयात पाठवून त्याला बांधकाम अधीक्षक अभियंत्यांची परवानगी मिळाल्यावर पुढील प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

# गांधी चौक पोलिसांच्या धाडसत्रीत घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपीला अटक




**लातूर/प्रतिनिधी**

शहरातील गांधी चौक पोलीस ठाणे हद्दीतील स्क्रैप मार्केट रोड भागातील शिवाजी ट्रेडर्स किराणा दुकानाचे व इतर काही दुकानाचे रात्री शटर उचकटून चोरी झाले संदर्भाने पोलीस स्टेशन गांधीचौक लातूर गुरनं. १२८/२०२४ कलम ४५७,३८० तसेच गुरनं.१३५/२०२४ कलम ४५७, ३८० भादंवी प्रमाणे गुन्हे दाखल झालेले होते. सदरचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस अधिक्षक सोमय मुंडे यांनी आदेशित केले होते. त्यावरून पोलीस अधिक्षक सोमय मुंडे, अप्पर पोलीस अधिक्षक डॉ. अजय देवरे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांचे नेतृत्वात पोलीस ठाणे गांधीचौक डी.बी. पथकातील अधिकारी व अंमलदारचे पथक तयार करून त्यांना सखोल मार्गदर्शन व सुचना देण्यात आल्या होत्या. दि.०९/०३/२०२४ रोजी सदर पथकाने कोम्बींग ऑपरेशन दरम्यान कारवाई करत ६० फूटी रोड परिसरात हातात लोखंडी तलवार घेवुन फिरणारा इसमाला लोखंडी तलवार ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव गांव विचारले असता त्याने त्याचे नाव गौस मुस्तफा सय्यद, वय २६ वर्षे रा. बौध्दनगर, लातुर असे सांगीतले. त्या वरून पोलीस स्टेशन गांधी चौक गुरनं. १३८/२०२४ कलम ४,२५ भारतीय शस्त्र अधिनियम व सहकलम १३७ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर आरोपीस डी.बी. पथकाने विश्वासात घेवून इतर चोरीच्या गुन्हयाबाबत कसून विचारपूस केली असता त्याने गेल्या दहा ते पंधरा दिवसात त्याचा साथीदार आसीफ जावेद पठाण रा. आनंद नगर, लातूर व आणखीन साथीदार असे मिळून रात्रीचे वेळी मोटार सायकलवर बसून लातूर शहरातील डालडा फॅक्टरी जवळ व शिवाजी रोड परिसरातील वेगवेगळी दुकाने लोखंडी कटावणीने (रॉड) शटर उचकटून आत जावून रोख रक्कम पैशाची चोरी व काजू यांची चोरी केली आहे असे सांगितले. सदर गुन्हेगार हे रेकॉर्डवरील सराइत गुन्हेगार असून त्यांचेकडून इतर गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे. गुन्ह्यातील इतर फरार आरोपींचा शोध सुरू असून त्यांना लवकरच अटक करण्यात येणार आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक सोमय मुंडे, अप्पर पोलीस अधिक्षक डॉ. अजय देवरे, पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांचे नेतृत्वात पोलीस ठाणे गांधीचौक डी.बी. पथकातील पोलीस उपनिरीक्षक अक्रम मोमीन, पोलीस अमलदर राजेंद्र टेकाळे, दामोदर मुळे, राम गवारे,दतात्रय शिंदे, रणविर देशमुख, शिवाजी पाटील, संतोष गिरी यांनी केलेली आहे.

# कुत्र्याच्या हल्ल्यात विद्यार्थी जखमी



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील कुईलू ग्रामपंचायत हद्दीतील नेहालपाडा येथील जिल्हा शाळेत शिकणारा विद्यार्थी सकाळच्या मधल्या सुट्टीत नास्ता करण्यासाठी घराकडे जात असताना एका पिसाळलेल्या कुत्र्याने अचानक हल्ला करून त्याच्या हाताला, पायला पाठीवर व छातीवर चावा घेतल्याने मुलगा गंभीर जखमी झाला होता त्याला वाडा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असून त्याच्यावर उपचार सुरु आहेत. सद्या मुलाची प्रकृती स्थिर आहे. बुधवारी राज उमेश लोखंडे (वय १०) हा मधल्या सुट्टीत नास्ता करण्यासाठी घरी जात असताना रस्त्यातच एका पिसाळलेल्या कुत्र्याने त्याच्यावर अचानक हल्ला करून त्याच्या पायला चावा घेतला. खाली पडलेल्या राजच्या पाठीला व पोटाला गंभीर जखमा झाल्या आहेत. घटनेच्या अगोदर या कुत्र्याने गावातील ७ ते८ जणांचा चावा घेतला आहे तसेच एका गायिला व मांजरीला देखील जखमी केले असल्याची माहिती मिळाली आहे. गावातील इतर कुत्र्यांना चावा घेतला साल्याने ते कुत्रे देखील पिसाळू शकतात आणि ते कुत्रे जर पिसाळले तर त्याचा धोका नागरिकांना होऊ शकतो अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# ॲड.जयराज जाधव यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्रदान



**औसा/प्रतिनिधी**

औसा येथील सामाजिक चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते ड जयराज पांडुरंग जाधव यांना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष विभागाच्या वतीने देण्यात येणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा सामाजिक न्याय मंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषित केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य व क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांच्या उपस्थितीमध्ये समाजीक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव सुमंत भांगे आणि आयुक्त ओमप्रकाश बकोरिया यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देऊन व सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले. ॲड.जयराज जाधव यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल आणि आंबडेकरी चळवळीमध्ये भरीव दिलेल्या भरीव योगदानाबद्दल आंबेडकर प्रेमी बांधवातुन अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# लहानपणापासून चोरी करणारा अट्टल गुन्हेगार पोलिसांच्या ताब्यात

**मुंबई/प्रतिनिधी**

नवी मुंबईतील कोपरखैरणे पोलिसांनी घरफोडी करणाऱ्या एका अट्टल आरोपीस जेरबंद केले असून त्याच्याकडे १७ तोळे वजनाचे दागिने जप्त केले आहेत. आरोपीच्या अटकेने पाच गुन्ह्यांची उकल झाली आहे. आरोपी हा लहान वयापासूनच घरफोडी करत असल्याचे चौकशीत समोर आले आहे. रिजवान उस्मान खान असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. बोनकोडे येथे राहणारे वसीम पटेल हे दोन तारखेला सकाळी सव्वाआठ ते साडेनऊ दरम्यान कामानिमित्त घराबाहेर होते. याच दरम्यान त्यांच्या घराचा कडी कोयंडा तोडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करीत घरातील २ लाख ७० लाख रुपयांचे दागिने चोरी केले होते. याबाबत कोपरखैरणे पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता. गुन्हा नोंद केल्यावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी तात्काळ कारवाई करीत एक पथक नेमले. पोलीस निरीक्षक सुहास चव्हाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर टकले, पोलीस उपनिरीक्षक मंगेश कन्नेवाड, पोलीस हवालदार योगेश डोंगरे, संतोष चिकणे, विनोद कांबळे, राकेश पाटील, दिपाली पवार, पोलीस शिपाई औदुंबर जाधव, राहुल डोंबाळे, किरण बुधंवत, शंकर भांगरे या पथकाने तपास करीत असताना सदर गुन्ह्याचे घटनास्थळ परिसरात सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. त्यात चित्रणात आरोपी आढळून आला होता. याबाबत खबऱ्यांनाही सतर्क करण्यात आले होते. या प्रयत्नांना यश आले व आरोपी मुंब्रा येथील असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मुंब्रा येथे तपास करत त्याचा ठावठिकाणा शोधून काढला व सापळा रचून त्याला अटक करण्यात आली. अटक आरोपीकडून ५ गुन्ह्यातील १७ तोळ्याचे दागिने जप्त करण्यात आलेले आहेत. अशी माहिती पत्रकार परिषदेत पोलीस




उपायुक्त पंकज डहाणे यांनी दिली.

# अटल सेतूवरून उडी मारून डॉक्टर महिलेने जीवन संपवलं

**नवी मुंबई/प्रतिनिधी**

अटल सेतू ह्या मार्गाला जगभरातून पसंती मिळत आहे. मात्र मार्ग सुरू होताच अनेक प्रवाशांनी ह्या मार्गाने हौस म्हणून प्रवास केला तर काहींनी कामानिमित्त प्रवास केला. आता या मार्गावर एक धक्कादायक घटना घडली आहे. ह्या मार्गावरून जाणाऱ्या एका महिलेने चक्क टॅक्सी थांबवून थेट उडी मारून आत्महत्या केल्याचा धक्कादायक घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, किंजल शाह वय (४३) असं या महिलेचं नाव आहे. न्हावा शेवा पोलिसांकडून त्यांच्या मृतदेहाचा शोध घेण्यात येत आहे. मात्र, अटल सेतूवरुन आत्महत्येचा प्रकार घडल्याने सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. डॉ. किंजल शहा गेल्या अनेक वर्षांपासून नैराश्यात होत्या. नैराश्यातूनच त्यांनी टोकाचे पाऊल उचलले असावे. त्या दादरच्या नवीन आशा इमारतीत त्यांच्या कुटुंबीयांसह राहत होत्या. बाहेर काम आहे, असं सांगून त्या घरातून सकाळच्या वेळी निघाल्या होत्या. त्यानंतर किंजल शहा यांनी अटल सेतूवर येताच टॅक्सी चालकाला फोटो काढायचा आहे, असं सांगून टॅक्सी थांबवली. त्यानंतर टॅक्सीमधून उतरून त्यांनी अटल सेतूवरून उडी मारून आत्महत्या केली. या झालेल्या घटनेचे गांभीर्य ओळखून टॅक्सी चालकाने पोलिसांना माहिती दिली. काही वेळातच पोलीस देखील घटनास्थळी दाखल झाले. तसेच त्यांनी लिहून



ठेवलेली सुसाईड नोट वडिलांना सापडली. अटल सेतूवर टॅक्सीने आत्महत्या करण्यासाठी जात असून टॅक्सी चालकास त्रास देऊ नये, असे त्यांनी त्या चिठ्ठीत लिहिलेले होते. त्यांच्या वडिलांनी तत्काळ भोईवाडा पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. भोईवाडा पोलिसांनी न्हावा शेवा पोलिसांशी संपर्क साधल्यानंतर महिलेची ओळख पटली. मात्र त्याआधी भोईवाडा पोलिसांनी परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली होती. ही महिला दादरहून १.४५ वाजता टॅक्सीत बसल्याचे आढळले होते. त्या दिशेने पोलिसांनी तपासाला सुरुवात केली आहे. त्यांनी २.१४ वाजता अटल सेतूवरुन उडी मारल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. त्यांचा शोध घेण्यासाठी अटल सेतू येथील समुद्रात मच्छिमारांची मदत घेतली जात आहे.

# मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर ऑईल वाहून नेणाऱ्या ट्रकला भीषण आग

**वसई/प्रतिनिधी**



मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर बुधवार २० मार्च रोजी संध्याकाळी ६.३० वाजता दरम्यान विवळवेढे आणि धानीवरी गावाच्या मध्ये गुजरात मार्गिकेवर धागे धुण्याच्या केमर्ट (chemart) नामक ऑईलच्या टाक्या वाहून नेणाऱ्या ट्रकला अचानक आग लागल्याची घटना घडली आहे. यामुळे ट्रक मधील ऑईल महामार्गावर पसरले असून यावरून दुचाकी स्वारांना प्रवास करणे अवघड झाले आहे. मुंबई कडून गुजरात कडे निघालेल्या ट्रकला आंतरिक बिघाडामुळे अचानक आग लागली आहे. चालकाने प्रसंगावधान राखत गाडी बाजूला घेत चालक उतरल्यामुळे त्याला कोणतीही इजा झालेली नाही. आगीच्या घटनेमुळे साधारण दोन तास दोनही मार्गीकेवर मोठी वाहतूक कोंडी होऊन जवळपास सहा ते सात किलोमीटर पर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. यामुळे वाहनचालक आणि प्रवाश्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत दोन्ही बाजूची वाहतूक रोखून धरत आग विझवण्यासाठी अग्निशामक दलांना पाचारण केले. मात्र तोपर्यंत आगीने रौद्र रूप धारण केले असून यामध्ये ट्रक जळून खाक झाला आहे. आगीमध्ये ट्रकची चाके फुटून लांब उडाल्याने नजीकच्या जंगलाला सुद्धा आग लागून काही प्रमाण गवत जळाले आहे. साधारण एका तासाने डहाणू नगरपरिषद आणि अदानी थर्मल पॉवर स्टेशन डहाणू येथील अग्निशामक दल घटनास्थळी दाखल झाले असून आग विझवण्यासाठी प्रयत्न सुरू झाले असून दोनही मार्गिकेवरील वाहतूक धीम्या गतीने सुरू करण्यात आली आहे.

पान १ वरून....

## माहेरचे प्रेम लपवण्यासाठी आईने ...

करून गळा आवळल्यानंतर तिने कुऱ्हाडीने त्याचे शीर धडावेगळे केल्याचे पोलिस तपासात पुढे आले आहे. त्यानंतर तिने स्वतःही गळफास लावून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो अयशस्वी झाला. त्यामुळे तिने लागलीच दीड ग्लास तणनाशक औषधाचे प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला होता.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रणव गणेश चोपडे (६) असे या मुलाचे नाव आहे. जन्मदात्रीच्या हातून खून झालेला मुलगा गावातील एका शाळेत पहिलीच्या वर्गात शिक्षण घेत होता. प्रणवची हत्या निर्दयी आईने केल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. हे भयानक कृत्य करून गळफास लावून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केलेली त्याची आई कौशल्या ऊर्फ कोमलला उपचारासाठी शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तिचे सासरे नारायण जगन्नाथ चोपडे (५७) यांनी कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात यासंदर्भात दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांची सून कौशल्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मात्र तिने एवढे टोकाचे पाऊल का उचलले, हे लगेच समजू शकले नाही. पोलिसांनी अजुन तपास सुरू असल्याची माहिती दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळी फिर्यादी नारायण आणि त्यांच्या पत्नी पार्वती दोघे दुचाकीवर बसून मौजे पाच पिंपळे (ता. परांडा, जि. धाराशिव) येथे नातेवाइकाच्या लग्नासाठी गेले होते. दुपारी १२.२० वाजेच्या सुमारास त्यांची सून कौशल्या ऊर्फ कोमल हिचा त्यांना फोन आला. रडत रडत तिने आपण मुलगा प्रणवचा खून केल्याची माहिती दिली. तेव्हा धक्का बसलेल्या नारायण चोपडे यांनी कौशल्याचा भाऊ नवनाथ जगताप (रा. कुर्डू, ता. माढा) आणि आपला मुलगा गणेश (मयत मुलाचे वडील) यांच्याशी संपर्क साधून याची माहिती दिली. त्यानंतर त्या दोघांना तात्काळ घरी जाण्यास सांगितले. दरम्यान, गणेश हा घरी धावून आला असता घरातील भयानक दृश्य पाहून तो पार कोसळला. पत्नी कौशल्याने कुऱ्हाडीने मारून चिमुकल्याचे दोन तुकडे केल्याचे भीषण चित्र त्याला पाहायला मिळाले. कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल झाला असून नारायण चोपडे यांनी फिर्याद दिली आहे. कुर्डवाडी पोलीस ठाण्यातील एपीआय जायपत्रे अधिक तपास करत आहेत.

## मुलीला त्रास देताच बापाचे डोके...

सासरा संतोष नाईक याला शिवीगाळ केल्याची माहिती समोर आली. तसेच याच वादामुळे संतोष नाईकने योगेशला ठोशाबुक्क्याने मारहाण केली होती. या मारहाणीत योगेश बेशुद्ध पडला होता. त्यानंतर संतोषने योगेशला प्लास्टिकच्या पिशवीत भरून घरापासून साधारण सात ते आठ किलोमीटर अंतरावर असलेल्या मोऱ्याचा पाडा गावाच्या हद्दीतील बारवी नदीच्या पुलावरून नदीत फेकून दिल्याने योगेशचा मृत्यू झाला होता.

पान ८ वरून....

## पालघर लोकसभा निवडणूकीच्या...

असून त्यासाठी निवडणूक विभागाने व्यवस्था केली आहे प्रशासन त्यांचा शोध घेऊन त्यांच्यापर्यंत पोहोचणार आहेत. जिल्ह्यातील सहा मतदारसंघासाठी २२६३ मतदान केंद्रावर ईव्हीएम कंट्रोल युनिट व व्हीव्हीपॅट मशीन उपलब्ध करण्यात आल्या आहेत जिल्ह्यात २७२३ ची आवश्यकता असून यापैकी आवश्यकता असून त्यापेक्षा जास्त म्हणजे ४७७ बॅलेट प्रशासनाकडे उपलब्ध आहेत, तर २७२३ कंट्रोल युनिटची आवश्यकता असताना ३१४४ कंट्रोल युनिट उपलब्ध आहेत. २९२५ व्हीव्हीपॅट मशीनची आवश्यकता असताना प्रत्यक्षात ३३५७ मशीन उपलब्ध झाली आहेत, अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून प्रशासन सज्ज असून निवडणुकीच्या काळात आचारसंहितेचा भंग होणार नाही, यासाठी दखल घेण्यात येणार असून नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या नियंत्रण कक्षामार्फत स्टॅटिक सर्व्हिलियंस, व्हिडिओ सर्व्हिलियन्स, व्हिडिओ विविंग टीम व फ्लाईंग स्क्वाड नेमण्यात आले आहेत. मतदानाच्या दहा दिवस अगोदर नवमतदारांना मतदार होण्याची व नाव नोंदवण्याची संधी उपलब्ध आहे. जिल्ह्यात किंवा जिल्हा राज्याबाहेरचा स्थलांतर झालेल्या जिल्ह्यातील नागरिकांना मतदान करण्यासाठी जिल्ह्यात नाव असलेल्या ठिकाणी येऊनच मतदान करावे लागेल. त्यासाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था नाही, असे त्यांनी सांगितले.

## आचोळे पोलिसांनी मुद्देमालासह...

अटक करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आचोळे पोलिसांना सूचना दिल्या होत्या. गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी, अंमलदार हे तांत्रिक विश्लेषणाद्वारे पाहिजे आरोपींचा शोध घेत होते. गुन्ह्यातील मुख्य आरोपी राहुल शहा हा स्वतःचे अस्तित्व लपवून पुरावे नष्ट करून बनावट आधारकार्ड व त्यावर स्वतःचे नाव बदलून कर्नाटक, पश्चिम बंगाल, दिल्ली व नेपाळ अश्या वेगवेगळ्या राज्यातील आलिशान हॉटेलमध्ये वास्तव्य करीत होता. आरोपी राहुल हा पवईतील मेलुहा द फर्न या हॉटेलमध्ये असल्याची माहिती मिळाल्यावर त्याला तेथून ताब्यात घेतले. आरोपी तेथे सुरेश भगत या नावाचे बनावट आधारकार्ड देत वास्तव्य करत होता. आरोपीकडून वेगवेगळ्या व्यक्तीच्या नावे असलेली ८ सिमकार्ड, नेपाळचे १ सिमकार्ड, २ लॅपटॉप, १ आयपॅड, ९ मोबाईल, ३ बनावट आधारकार्ड, फेडरल व टीएनबी बँकेच्या बनावट एनओसी मिळून आले. त्याने जगदीश माळीच्या नावावर १२ महागड्या कार परराज्यात विक्री केल्याचे निष्पन्न झाले आहे. आचोळे पोलिसांनी राहुल उर्फ सचिन उर्फ सौरभ शहा, विजय सिंग, भिकाजी उर्फ उमेश गोपाळे, मोहम्मद नजर खान, प्रवीण उर्फ राणू जैन, आकाश मुसळे आणि विवेक करंडे या सात आरोपींना अटक करून २ करोड ३४ लाख ५३ हजार ३०२ रुपये किंमतीच्या १२ महागड्या कार जप्त केल्या आहेत. सदरची कारवाई पोलीस उपायुक्त पोर्णिमा चौगुले-श्रींगी, सहाय्यक पोलीस आयुक्त उमेश माने-पाटील यांचे मार्गदर्शनाखाली आचोळ्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) विवेक सोनवणे, पोलीस निरीक्षक विजय चव्हाण, तपास पथकाचे सपोनि यशपाल सूर्यवंशी, पोलीस उपनिरीक्षक सुहास म्हात्रे, पोलीस हवालदार दत्ताराम दाईगडे, शंकर शिंदे, प्रशांत सावदेकर, निखिल चव्हाण, विनायक कचरे, अमोल सांगळे, मोहनदास बंडगर, मनोज पाईकराव, अमोल बरडे यांनी केली आहे.

## प्रतिभाताई जाधव यांना पीएचडी...

संतोष सोमवंशी, माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांचे स्विय्य सहाय्यक कमलाकर कदम, मुख्याध्यापक सूर्यकांत चव्हाण, मुख्याध्यापिका अरूणा कांदे यांच्यासह जेएसपीएम परिवारातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी त्यांचे कौतुक केले. त्याच्या या दैदिप्यमान यशाचे श्रेय सर्व गुरूजन व आईवडिलांना दिले असल्याची प्रतिक्रियाही त्यांनी यावेळी बोलताना दिली.

## उल्लास ॲपमधील नोंदणीला ...

वाढीव देण्याची तरदुत आहे. NIOS (राष्ट्रीय मुक्त शिक्षण मंडळ) या बोर्ड मार्फत ही परीक्षा घेण्यात आली. एकूण ९ माध्यमातून परीक्षा देण्याची मुभा होती. उत्तीर्ण झालेल्या नवसाक्षरांना प्रमाणपत्र देण्यात येईल. या परीक्षेसाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी एकूण पाच भागात पुस्तके उपलब्ध करून दिली होती. स्वयंसेवकांमार्फत परीक्षेत बसणाऱ्या नवसाक्षरांना यातील अभ्यासाचे धडे देण्यात आले होते. एका स्वयंसेवकाडून दहा निरक्षर व्यक्तींची नोंदणी करण्यात आली होती. त्यांची परीक्षेची प्राथमिक तयारीही त्यांनी करून घेतली होती. यापुढेही शाळाव्यवस्थापन समित्यांनी आपले शाळा तसेच गावाच्या परिसरातील १५ वर्षे व त्यापुढील निरक्षरांची उल्लास पवर १००% नोंदणी करावी अशी माहिती शेषराव बडे शिक्षणाधिकारी (योजना) यांनी दिली आहे. शिकण्याची इच्छाशक्ती असलेल्या परीक्षेत सहभागी झालेल्या सर्व नवसाक्षरांचे जिल्हाधिकारी गोविंद बोडके आणि मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी अभिनंदन केले आहे.

## कामाच्या ठिकाणी लैंगिक छळापासून...

माहिती सांगितली. इन्स्टिटयूशनस् इनोव्हेशन काऊन्सिलचे अध्यक्ष डॉ.आशिष चौधरी यांनी ह्या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयाचे जॉईंट डायरेक्टर विशाल सावे यांनी सदर कार्यक्रमास आपल्या शुभेच्छा दिल्या. तसेच प्राचार्य डॉ. हरीश वणकुद्रे सरांनी डॉ. नीता श्रीवास्तव प्रसाद ह्याचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत केले आणि जागतिक महिला दिनानिमित्त त्याचे अभ्यासपूर्ण विचार मांडले. मोठ्या उत्साहात आणि आनंदाने महिला दिन साजरा करणे ही संस्थेसाठी एक अविस्मरणीय स्मृती होती असे सांगून सांगता करण्यात आली.

## पालघर लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाची जय्यत तयारी

# निवडणुकीत आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करणार-जिल्हाधिकारी बोडके

**पालघर/प्रतिनिधी**




निवडणूक आयोगाने लोकसभेची निवडणूक जाहीर केल्याने पालघर लोकसभा मतदारसंघाची जिल्हा प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. राज्याच्या शेजारील दादरा नगर हवेली व गुजरातच्या सीमेवर कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. आदर्श संहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज असल्याची माहिती जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी दिली. जिल्हा प्रशासनाच्या तयारीबाबत माहिती देताना ते म्हणाले, की लोकसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पालघर जिल्हा प्रशासनाची तयारी अंतिम टप्प्यात आहे. जिल्हा प्रशासनाने नेमलेल्या विविध यंत्रणांमध्ये समन्वय साधला जात आहे. जिल्हा परिषदे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, जिल्हा पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी अपर्णा सोमाणी आदी या वेळी उपस्थित होते. पालघर व लोकसभा मतदारसंघासाठी २६ एप्रिलला अधिसूचना प्रसिद्ध होणार आहे. तीन मेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. चार मे रोजी उमेदवारी अर्ज यांची छाननी होणार आहे. सहा मे रोजी इच्छुक उमेदवारांना उमेदवारी अर्ज परत घेण्याची संधी आहे. वीस मे रोजी मतदान असून चार जून रोजी मतमोजणी होणार आहे. पालघर जिल्ह्यात डहाणू, विक्रमगड, बोईसर, नालासोपारा, वसई पालघर अशा सहा विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. या मतदारसंघांमध्ये २२५० मतदान केंद्रातून १३ सहाय्यक मतदान केंद्र असणार आहेत. पालघर जिल्ह्यात पाच संवेदनशील मतदान केंद्रे असून या मतदान केंद्रांवर जिल्हा प्रशासनाचे अतिशय बारकाईने लक्ष असणार आहे. कोसबाड भागातील १२४ ते १२७ मतदान केंद्र, पालघरमधील २३ क्रमांकाचे मतदान केंद्र संवेदनशील आहे. जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघात २१ लाख ६८९ मतदार असून यामध्ये दहा लाख ९९ हजार ७४३ पुरुष तर दहा लाख ७२९ महिला मतदार आहेत. २१७ तृतीयपंथी मतदार आहेत, तर जिल्ह्यात ३२६ नोकर मतदार आहेत. जिल्ह्यात १५ हजार ८४८ दिव्यांग मतदार असून त्यापैकी नऊ हजार ९७ पुरुष तर ६७९ महिला आहेत. दोन तृतीयपंथी मतदार आहेत. मतदान केंद्रात येऊ न शकणाऱ्या ८५ वर्षापेक्षा जास्त वयाच्या वृद्धांना तसेच दिव्यांगांना घरून मतदान करण्याची परवानगी देण्यात आली ...पान ६ वर

## लातूर शासकीय महिला तंत्रनिकेतन येथील स्ट्राँग रुमची पाहणी



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर लोकसभा मतदारसंघातील मतदानानंतर मतदान यंत्रे (ईव्हीएम) मशीन लातूर येथील शासकीय महिला तंत्रनिकेतन येथील स्ट्राँग रूममध्ये ठेवण्यात येणार आहेत. या स्ट्राँग रूमची आज जिल्हधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी संयुक्त पाहणी केली. तसेच येथील मतमोजणी कक्षातील व्यवस्थेचा आढावा घेतला. प्रभारी अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, पोलीस उपाधीक्षक जी. एल. भातलवंडे यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. लातूर लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा मतदारसंघांचा समावेश होतो. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्व मतदान यंत्रे शासकीय महिला तंत्रनिकेतन येथील स्ट्राँग रूममध्ये ठेवण्यात येणार असल्याने त्याबाबतची पूर्वतयारी सुरु आहे. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक श्री. मुंडे यांनी स्ट्राँग रूमची, मतदान कक्ष आणि परिसराची संयुक्त पाहणी केली. यावेळी त्यांनी स्ट्राँग रूममधील व्यवस्था, मतमोजणी कक्षातील बैठक व्यवस्था, पार्किंग व्यवस्था आदी बाबींचा आढावा घेतला. तसेच या अनुषंगाने संबंधितांना सूचना दिल्या.

## अपयशावर मात करून यशाला गवसणी घालावी -डॉ.किरणकुमार बोंदर




**लातूर/प्रतिनिधी**

शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शिक्षण घेण्यासाठी वयाची अट नसते. आपल्या समोर अपयश आले तरी खचून न जाता विद्यार्थ्यांनी अपयशावर मात करून यशाला गवसणी घालावी, असे आवाहन उच्च शिक्षण विभागाच्या नांदेड विभागाचे सहसंचालक डॉ. किरणकुमार बोंदर यांनी केले. येथील राजमाता जिजामाता बी.एड. महाविद्यालयात सीईटी, टेट, एमपीएससी आदी स्पर्धा परीक्षेच्या परिसंवादाचे उद्घाटन डॉ. बोंदर यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शिक्षण मंडळाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी नांदेडच्या विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयातील मुख्य लिपिक सुभाष धोंडगे, राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, संस्थेच्या विधी सल्लागार राणी केंद्रे, उपप्राचार्या प्रा. कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक प्रा. अश्विनी केंद्रे, प्रा. आर. व्ही. जायेभाये, राजीव मुंढे, प्राचार्य आर. एम. चव्हाण, डॉ. एन. के. सय्यद, प्रा. अरुण करदुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. बोंदर म्हणाले, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात बी. एड. चा अभ्यासक्रम चार वर्षांचा आहे. एमपीएससी, सेट, नेटच्या परीक्षांमध्ये बी. एड. चा अर्धा अभ्यासक्रम असतो. त्यामुळे बी. एड.च्या विद्यार्थ्यांसाठी ही जमेची बाब आहे. आपण जिथे आहोत तिथे परिश्रम घेतले तर यश हमखास मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी व परिश्रम घेऊन यशाचे शिखर गाठावे, असे आवाहन करून राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेजने विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेला हा परिसंवाद कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार डॉ. बोंदर यांनी काढले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य केंद्रे म्हणाले, राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुल विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देते. या संकुलातील विद्यार्थी विविध क्षेत्रात उच्च पदांवर कार्यरत आहेत. मागच्या वर्षी या संकुलातील संस्कृती पवार या विद्यार्थिनीने 'नीट' परीक्षेत ७२० पैकी ६९० गुण मिळवले असून तिला नागपूर येथे एम्सला प्रवेश मिळाला आहे. संकुलातील भावी शिक्षकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा परिसंवाद आयोजित केल्याचे त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन प्रा. नभा बडे यांनी केले तर आभार डॉ. एन. के. सय्यद यांनी मानले.

## रुद्र व दाक्षायणी महिला मंडळाने नारी शक्तीचा केला सन्मान



**अहमदपूर/फिरोज शेख**

अनादी काळापासून भारतीय संस्कृतीमध्ये महिलांना अत्यंत मानाचे स्थान असून आजही या बदललेल्या समाज संस्कृतीमध्ये घरात आणि समाजात महिलांचा सन्मान करा असे आग्रही प्रतिपादन चंदाताई बाबासाहेब पाटील यांनी केले.त्या दिनांक २१ रोजी रुद्र व दाक्षायणी महिला मंडळाच्या वतीने वीरशैव मंगल कार्यालयात जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील कर्तृत्वान नारींचा सन्मान सोहळ्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रुद्र महिला मंडळाच्या अध्यक्षा विजयाताई चवंडा व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून सिद्धेश्र्वर सहकारी बँकेच्या संचालिका प्रा.डॉ.सुनिता लोहारे-चवळे, माजी नगराध्यक्षा सुशीला चौधरी, माजी नगराध्यक्षा अश्विनी कासनाळे, विजया हामणे, स्वागताध्यक्षा संगीता अभय मिरकरले यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी विविध क्षेत्रातील कर्तृत्वान महिलांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थितांची मनोगत पर भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शासनाचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार विजेत्या आशा रोडगे- तत्तापूरे यांनी केले. सूत्रसंचालन सविता शेटकार यांनी तर आभार अध्यक्षा शिवानी चवंडा यांनी मानले. यावेळी आंतरराष्ट्रीय योग शिक्षिका वृषाली चवळे, संगीता खंडागळे, शितल मालू, सुनंदा कुलकर्णी, आशा आवाळे, आंतरराष्ट्रीय खेळाडू माही आरदवाड, जान्हवी जाधव, मधुरा करकनाळे, डॉ.नेहा पाटील, डॉ.वर्षा भोसले, डॉ.मयूरी चलवदे,डॉ.रुद्राणी शेटकार या कर्तत्वान नवदुर्गांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सध्या काही महिला भगिनी भारतीय संस्कृतीच्या संस्कारापासून दुर जात आहेत म्हणून दाक्षायणी महिला मंडळाच्या सदस्यांनी सोहळा शृंगरा बद्दल चे वैज्ञानिक व अध्यात्मिक महत्त्व सांगितले आहे. या सोहळ्याला माजी उपनगराध्यक्ष अभय मिरकले, कपिल बिराजदार, सुनील शेटकार, प्रेमा वतनी, कलावती भातांब्रे यांच्यासह रूद्र व दाक्षायणी महिला मंडळाच्या सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## लोनवरील महागड्या कार परराज्यात विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफास

# आचोळे पोलिसांनी मुद्देमालासह ७ आरोपींच्या आवळल्या मुसक्या



**नालासोपारा/प्रतिनिधी**

बँकेची बनावट एनओसी तयार करून लोनवरील महागड्या कार परराज्यात विक्री करणाऱ्या ७ आरोपींच्या अंतरराज्य टोळीला अटक करण्यात आचोळे पोलिसांना यश मिळाले आहे. या टोळीकडून आचोळे गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी विविध राज्यातून २ करोड ३४ लाखांच्या १२ महागड्या कार जप्त केल्याची माहिती पोलीस उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रींगी यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत माहिती दिली आहे. आचोळे रोड परिसरात राहणारे जगदीश माळी यांना आरोपीने किराणा दुकानाच्या व्यवसायासाठी २ कोटीचे कर्ज मंजूर करून देतो असे सांगून त्यांच्या व्यवसायाची माहिती, दुकानाची कागदपत्रे घेत त्यांचा विश्वास संपादन करून विविध बँकेचे कर्ज मंजूर करण्यासाठी त्यांचे बँक ॲप्लिकेशन फॉर्म भरून घेतले. आरोपीने त्यांची कागदपत्रे महागड्या कार खरेदी करण्यासाठी बँकेत जमा करून जगदीश माळी आणि त्यांच्या पत्नीच्या नावावर खरेदी केले. बनावट कागदपत्रे व बनावट मेलद्वारे बँकेचे वेगवेगळ्या कर्ज मंजूर करून महागड्या कार त्यांच्या ताब्यात न देता त्यांची एकूण २ करोड ८४ लाख ४९ हजार रुपये इतक्या रकमेची फसवणूक केली आहे. त्यांनी आचोळे पोलीस ठाण्यात हकीकत सांगितल्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा दाखल झाल्यावर फसवणूक करणारी अंतरराज्य टोळी असण्याची दाट शक्यता असल्याने आरोपींना तात्काळ ...पान ६ वर

## प्रतिभाताई जाधव यांना पीएचडी प्रदान



**रेणापूर/प्रतिनिधी**

रेणापूर तालुक्यातील बिटरगाव येथील रहिवासी प्रतिभा संपतराव जाधव यांना इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (आयसीटी) मुंबई येथील प्रोफेसर डॉ.गिरीष जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली फिजिक्स पॉलिमर या विषयात संशोधन केल्यामुळे विद्यापीठाच्यावतीने त्यांना नुकतीच पीएचडी प्रदान करण्यात आली. प्रतिभा संपतराव जाधव यांचे शालेय शिक्षण जेएसपीएम शिक्षण संस्थाद्वारा संचालित महाराष्ट्र विद्यालयात पूर्ण झाले. पदव्युत्तर शिक्षण एमएससी फिजिक्स डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे पूर्ण झाले असून आयसीटी मुंबई येथील कॅम्पस इंटरव्युवमधून गुजरातमधील वापी येथे प्लास्टी इंडिया इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीमध्ये असिस्टंट प्रोफेसर म्हणून नोकरीची संधी त्यांना मिळालेली आहे. त्यांच्या यशाबद्दल जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, उपाध्यक्ष युवा नेते अजितसिंह पाटील कव्हेकर, संस्थेचे सचिव प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर,जेएसपीएमचे कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, जेएसपीएमचे समन्व्यक निळकंठराव पवार, शै.समन्वयक संभाजीराव पाटील, समन्वयक विनोद जाधव, प्राचार्य आर.एस.अवस्थी, प्राचार्य गोविंद शिंदे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, शिवसेनेचे नेते ...पान ६ वर

## उल्लास ॲपमधील नोंदणीला नवसाक्षरांचा उदंड प्रतिसाद!

### १३,२९८ नवसाक्षर बसले परीक्षेला; अनुसूचित जमातीचा सर्वात जास्त सहभाग



**पालघर/प्रतिनिधी**

केंद्रशासन पुरस्कृत उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम अंतर्गत सन २०२२-२३ ते २०२६-२७ या कालावधीत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पालघर जिल्ह्यात राबवणेत येत आहे. नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या पायाभूत साक्षरता (वाचन लेखन) व संख्याज्ञान चाचणी या परीक्षेला नवसाक्षरांचा उदंड प्रतिसाद मिळाला असून एकूण १३,२९८ निरक्षर व्यक्तींनी ही परीक्षा दिली आहे. यात ९५५३ महिला, ३७४५ पुरुष यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे या परीक्षेला जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या व्यक्तींनी सर्वात जास्त एकूण १२,२२४ स्त्री आणि पुरुष यांनी सहभाग घेतला असून यात ३५ दिव्यांग व्यक्ती आहेत. १५ वर्षांपासून तब्बल ९० वर्षापर्यंतच्या व्यक्तीने ही स्वयंस्फुर्तीने ही परीक्षा दिली. अत्यंत खेळीमेळीच्या आणि उत्साहाच्या वातावरणात ही परीक्षा संपन्न झाली. उल्लास अझझ वर एकूण १६४७० असाक्षरांची दिनांक १६/३/२०२४ पर्यंत नोंदणी झाली. साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी दिनांक १७ मार्च २०२४ रोजी ऑफलाईन पद्धतीने जिल्ह्यातील १३४७ शाळांमधून एकाच वेळी सकाळी १०.०० ते ५.०० या वेळेत केंद्रशासनाच्या निर्देशानुसार परीक्षा घेण्यात आली. गोविंद बोडके जिल्हाधिकारी पालघर आणि भानुदास पालवे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पालघर यांचे मार्गदर्शनाखाली हा उपक्रम जिल्ह्यात राबवण्यात आला. सदर परिक्षेसाठी चाचणी वाचन ५० गुण, लेखन ५० गुण, संख्याज्ञान ५० गुण अशी एकूण १५० गुणांच्या या परीक्षेला ५१ गुण उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असून ५ गुण ...पान ६ वर




## कामाच्या ठिकाणी लैंगिक छळापासून संरक्षण देण्यासाठी बनवलेल्या 'पॉश' कायद्याबाबत डॉ. माधवी वाघमारे यांनी दिली खास माहिती!



**वसई/प्रतिनिधी**

विद्यावर्धिनी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन काऊन्सिलच्या माध्यमातून जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम नुकताच आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नीता श्रीवास्तव प्रसाद यांची उपस्थिती लाभली. विद्यार्थी घडामोडी प्रमुख डॉ. माधवी वाघमारे ह्यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. महाविद्यालयाचे शिक्षक तसेच विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी डॉ. नीता श्रीवास्तव प्रसाद ह्यांनी Empower her:Celebrating Women Career Advancement या कार्यक्रमाच्या थीमला धरून महिलांनी आपले करिअर पुढे नेण्यासाठी उचलल्या जाणाऱ्या विविध पद्धती आणि पावले याबद्दल माहिती दिली. ठराविक चौकटीत न राहता संपूर्ण ताकदीनिशी आयुष्य जगण्याच्या गरजेवरही त्यांनी भर दिला. तसेच महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी लैंगिक छळापासून संरक्षण देण्यासाठी बनवलेल्या 'पॉश' कायद्याबाबत त्यांनी खास ...पान ६ वर

25 TO 31 MARCH 2024 - Page 5 (CRIME SANDHYA)8315:Layout 1 3/23/2024 8:39 PM Page 1



# उत्तरप्रदेशातील अमली पदार्थांचा कारखाना ठाणे पोलिसांकडून उद्ध्वस्त; पोलिसांनी सुमारे दीड महिने मजूर बनून केली रेकी!

**ठाणे/प्रतिनिधी**

उत्तरप्रदेशातील वाराणसीमध्ये मेफेड्रॉन (एमडी) क्रिस्टल पावडर हा अमली पदार्थ तयार करणारा कारखाना ठाणे पोलिसांनी उद्ध्वस्त केला आहे. ठाणे गुन्हे अन्वेशन शाखेच्या कर्मचाऱ्यांनी मजूर बनून या कारखान्याची रेकी केली होती. वास्तव्यासाठी त्यांनी एक खोली देखील भाड्याने घेतली होती. गावकऱ्यांना संशय येऊ नये म्हणून हिंदीमध्ये संभाषण सुरू ठेवले होते. अमली पदार्थाचा कारखाना उद्ध्वस्त झाल्याने ठाणे पोलिसांचे कौतुक होत आहे. पोलिसांनी याप्रकरणात आतापर्यंत सहा जणांना अटक केली आहे. आफताब मलाडा (२२), जयनाथ यादव (२७), शेरबहादूर सिंग (२३), हुसेन सैय्यद (४८), अतुल सिंह (३६) आणि संतोष गुप्ता (३८) अशी अटकेत असलेल्या आरोपींची नावे आहेत. तर, अमली पदार्थ बनविणाऱ्या म्होरक्याचा पोलीस शोध घेत आहेत. पोलिसांनी २७ कोटी ८७ लाख १७ हजार ९०२ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. घोडबंदर येथील कासारवडवली भागात २४ जानेवारीला काहीजण अमली पदार्थ विक्रीसाठी आल्याची माहिती ठाणे गुन्हे अन्वेषण



शाखेच्या युनीट एकला मिळाली होती. त्याआधारे पोलिसांनी कारवाई करून आफताब, जयनाथ, शेरबहादूर आणि हुसेन यांना अटक केली होती. पोलिसांना त्यांच्याकडे १४ लाख ५ हजार रुपये किमतीचे एमडी क्रिस्टल पावडर आढळून आली. त्यांची चौकशी केली असता, त्यांनी हा एमडी उत्तरप्रदेशमधून आणल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी आणखी माहिती घेण्यास सुरूवात केली. त्यावेळी वाराणसी येथील भगवतीपुर गावात एमडी क्रिस्टल पावडर तयार करण्याचा कारखानाच सुरू असल्याची माहिती युनीट एकला मिळाली. त्यानुसार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप पाटील यांनी उत्तरप्रदेश पोलिसांना संपर्क साधला. कारवाईसाठी पोलिसांनी त्यांना गावामध्ये एक खोली भाड्याने घेण्याची सूचना केली. उत्तरप्रदेश पोलिसांनी खबऱ्यामार्फत एक खोली गावात भाड्याने घेतली. त्यानंतर साहाय्क पोलीस निरीक्षक रूपाली पोळ, पोलीस नाईक विजय यादव तसेच युनीट एकच्या पथकाने दीड महिने या गावात रेकी करण्यास सुरूवात केली. त्यानंतर शनिवारी दिलीप पाटील, साहाय्यक पोलीस निरीक्षक रूपाली पोळ, साहाय्यक उपनिरीक्षक रविंद्र पाटील, पोलीस हवालदार अमोल देसाई, प्रशांत निकुंभ आणि पोलीस नाईक विजय यादव यांच्या पथकाने कारखान्यावर छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी अतुल आणि संतोष या दोघांना ताब्यात घेतले. पोलिसांनी या कारखान्यातून २ हजार ६४५ किलो ग्रॅम वजनाचा २ कोटी ६४ लाख ५० हजार रुपयांचा एमडी क्रिस्टल पावडर जप्त केली. तसेच मेफेड्रॉन, मेथेलामीन, क्लोरिफॉर्म, हायड्रोक्लोरिक सिड असे अनेक रसायने जप्त केली. या मिश्रणातून २५ कोटी रुपयांची एमडी क्रिस्टल पावडर तयार होते असे तपासात उघड झाले आहे.

या प्रकरणातील मुख्य आरोपी ओम गुप्ता हा फरार आहे. अमली पदार्थ तयार करण्याची त्याला पद्धत माहिती आहे. तो अतुल आणि संतोष या दोघांना माहिती देत असल्याचे समोर आले आहे. या कारवाईत रुपाली पोळ आणि विजय यादव या दोघांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. दोघेही याठिकाणी मजूर म्हणून काम करत असे. संशय येऊ नये म्हणून रुपाली या साधी साडी नेसत होत्या. तर विजय हे धोतर, साधे शर्ट, डोक्याला मफलर गुंडाळत असे. परिसरात वावरत असताना ते हिंदी भाषेतून संभाषण करत होते. तसेच रात्रीच्या वेळेत कारखान्यात कोण येते जात असतो याची रेकी करत होते.

# वालिव पोलिसांनी दुचाकी चोरणाऱ्या ३ आरोपींना अटक; ६ गुन्ह्यांची उकल!



**नालासोपारा/प्रतिनिधी**

दुचाकी चोरणाऱ्या तीन आरोपींच्या त्रिकुटाला वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी अटक केले आहे. पोलिसांनी या आरोपीकडून सहा गुन्ह्यांची उकल करून चोरीची १ रिक्षा आणि ५ दुचाकी असा एकूण ३ लाख ६० हजारांचा मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी प्रवीण बनगोसावी यांनी मंगळवारी दिली आहे. नाईकपाडा येथील शिवभिमनगर येथे राहणाऱ्या अन्वर कुरुश (२१) या तरुणाची ७० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरीला गेली होती. त्याने ९ मार्चला रात्री मेजरवाडी येथील सलामत चिकन शॉप समोर पार्किंग केलेली दुचाकी चोरट्याने चोरून नेली होती. वालीव पोलिसांनी वाहन चोरीचा गुन्हा दाखल केला होता. वसई विरार परिसरात मोटार वाहन चोरीचे वाढते प्रमाण लक्षात घेता परीमंडळ २च्या पोलीस उपायुक्त यांनी वाहन चोरीचे गुन्हे उघड करण्याबाबत आदेश दिले. वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे शोध मोहीम राबवून सातीवली परिसरातून आरोपी रोहित राजेश सिंग, अनिल कपूर सिंग आणि मोहन हरजित सिंग यांना ताब्यात घेतले. आरोपीकडे पोलिसांनी सखोल चौकशी करून वसई, विरार आणि नालासोपारा परिसरातून चोरी केलेल्या १ रिक्षा आणि ५ दुचाकी असा एकूण ३ लाख ६० हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. आरोपीकडून वालीव येथील ४, तुळींज येथील १ आणि पेल्हार येथील १ असे ६ गुन्ह्यांची उकल केली आहे.

यावेळी श्रीमती पौर्णीमा चौघुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ २ वसई, उमेश माने-पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) जिलानी सय्यद यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. सचिन सानप, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अं. विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.

# नालासोपाऱ्यात विजेच्या धक्क्याने मजुराचा जागीच मृत्यू



**नालासोपारा/प्रतिनिधी**

इमारतीच्या छताचे काम सुरू असताना उच्चदाब क्षमतेच्या वीजवाहक तारांचा स्पर्श होऊन झालेल्या दुर्घटनेत दोन कामगार होरपळले. यामध्ये एका कामगाराचा मृत्यू झाला. गुरुवारी सकाळी अकराच्या सुमारास नालासोपारा पूर्वेला ही दुर्घटना घडली. नालासोपारा पूर्वेच्या तुळींज येथील टाकी रोडवरील साधना इमारतीच्या दुरुस्तीचे काम सुरू होते. इमारतीच्या छतावर लोखंडी पत्र्याचे छत टाकण्यात येत होते. गुरुवारी सकाळी दोन कामगार हे काम करत असताना लोखंडी आकड्याचा (हूक) इमारतीच्या जवळील वीज वाहक तारेला स्पर्श झाला. यामुळे वीजेचा धक्का लागून दोन्ही कामगार होरपळले. त्यापैकी साबिर खान नावाच्या मजूराचा जागीच मृत्यू झाला. इमारतीच्या शेजारी महावितरणाची उच्च दाब क्षमतेची वीज वाहक तार होती. त्यामुळे ही दुर्घटना घडल्याचे स्थानिकांनी सांगितले. तुळींज पोलिसांनी याप्रकरणी अपमृत्यूची नोंद केली आहे.

# पाळणाघरात केंद्र चालकांकडून लहान मुलीचा छळ

**डोंबिवली/प्रतिनिधी**

डोंबिवली येथील फडके रोडवरील लहान मुलांचा सांभाळ करणाऱ्या हॅपी किड्स डे केअर सेंटरमध्ये लहान मुलांचा छळ होत असल्याची एक दृश्य ध्वनी चित्रफित समाज माध्यमांवर प्रसारित झाल्याने खळबळ उडाली आहे. याप्रकरणी रामनगर पोलिसांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या डोंबिवली जिल्हा संघटक कविता गावंडे यांच्या तक्रारीवरून हे केंद्र चालवणाऱ्या मालक आणि कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी पाळणाघर चालवणाऱ्या गणेश प्रभुणे, आरती प्रभुणे या दाम्पत्यासह राधा नाखरे या महिलेविरोधात गुन्हा दाखल केला आहे. अलीकडे पती-पत्नी दोघेही नोकरी करतात. आपल्या मुलांची परवड होऊ नये, तसेच त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून मुलांना ते पाळणाघरात ठेवतात. परंतु काही पाळणाघरात बालकांचे हाल केले जात असल्याचे या प्रकारातून उघडकीला आले आहे. पोलिसांनी सांगितले, डोंबिवली पूर्वेत राहणारे मंदार उगले आणि त्यांची पत्नी हे दोघे नोकरदार आहेत. त्यांची तीन वर्षांची मुलगी ते डोंबिवली पूर्वेकडील फडके रोडला लक्ष्मी सागर सोसायटीच्या दुसऱ्या मजल्यावर असलेल्या 'हॅपी किड्स डे केअर' या




पाळणाघरात ठेवतात. हे पाळणाघर प्रभुणे दाम्पत्य चालवते. मुलीला सांभाळण्यासाठी पाळणाघराच्या चालकाला उगले दाम्पत्य दर महिन्याला साडेआठ हजार रुपये शुल्क देतात. गणेशसह त्यांची पत्नी आरती प्रभुणे, राधा नाखरे हे पाळणाघरात लहान मुलांचा सांभाळ करतात. उगले यांच्या मुलीसह अनेक लहान मुले या पाळणाघरात सांभाळण्यासाठी आहेत. प्रभुणे दाम्पत्य आणि राधा नाखरे यांच्याकडून लहान मुलांना बांधून ठेवले जात होते. प्रसंगी शिक्षा म्हणून उलटे टांगून त्यांना मारहाण केली जात असे. मुलांना या पाळणाघरात शारीरिक आणि मानसिक त्रास दिला जात होता, अशा पालकांच्या तक्रारी वाढल्या होत्या. या पाळणाघरात साधना सामंत काम करण्यास रुजू झाल्या. त्यांनी बालकांना केंद्र चालकांकडून होत असलेल्या छळवणुकीचा धक्कादायक प्रकार पाहिला. सुरुवातीला त्यांनी या प्रकाराला विरोध केला. मात्र प्रभुणे दाम्पत्य काही ऐकत नव्हते. अखेर साधना सामंत यांनी हा प्रकार त्यांच्याकडील मोबाईल कॅमेरात कैद केला. ही दृश्य चित्रफित त्यांनी ठाकरे गटाच्या डोंबिवली जिल्हा संघटक कविता गावंड यांना दाखवली. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून कविता गावंड यांनी संबंधित पालकांना फोन करून सगळ्या घटनेची माहिती दिली. त्यानंतर पालकांनी जिल्हा संघटक गावंड यांच्यासह रामनगर पोलीस ठाणे गाठून आपल्या मुलीला देण्यात येणाऱ्या अमानुष वागणुकीची माहिती रामनगर पोलिसांना दिली. सुरुवातीला पोलिसांनी तुम्ही चाईल्ड वेल्फेअरमध्ये जा, असा सल्ला देऊन तक्रार नोंदवून घेण्यास टाळाटाळ केली. मात्र या गंभीर घटनेची माहिती डोंबिवली विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील कुराडे यांना मिळताच त्यांनी तत्काळ फिर्याद दाखल करून घेण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर रामनगर पोलीस ठाण्यात गणेश आणि आरती प्रभुणे या दाम्पत्यासह राधा नाखरे या नोकरदार महिलेविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला.

# देवणी बसस्थानक येथे पानपोईचे उदघाटन




**देवणी/प्रतिनिधी**

देवणी येथे जयवंतराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त देवणी शहर व तालुक्यातील येणाऱ्या गोरगरीब नागरिकांसाठी देवणी बसस्थानक येथे पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून आनंद जीवने पाटील मित्र मंडळाच्या वतीने पाणपोईच्या उद्घाटन करण्यात आले. यावेळी माजी प्राचार्य यशवंतराव पाटील, भाजपा चे ज्येष्ठ नेते हवगिराव पाटील, सामाजिक नेते, शेषरावजी मानकरी, व्यापारी बिपिन पाटील, चेअरमन विजयकुमार लुल्ले, शिवसेना शहर प्रमुख दीपक मळभगे, शिवाभाऊ कांबळे, श्रीमंत आना लुल्ले योगेश तगरखेडे करीम शेख, तहसील कार्यालयाचे पेशकर साळुंखे, व्यंकट बिजापुरे, पोलीस कर्मचारी उस्तुर्गे, विनायक कांबळे व देवणी बसस्थानकाचे आगार प्रमुख पाटील गावातील व तालुक्यातील अनेक नागरिक या पाणपोई उद्घाटन प्रसंगी उपस्थित होते.

# लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वळसंग पोलिसांचा रुट मार्च



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

लोकसभा निवडणूक, रमजान ईद, गुढीपाडवा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, श्रीराम जयंती, तसेच आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने वळसंग पोलिसांनी बुधवारी सकाळी वळसंग गावातून रूट मार्च करून शक्तिप्रदर्शन केले. यादरम्यान आदर्श आचारसंहिते मध्ये काय करावे व काय करू नये, याबाबत वळसंग पोलिसांकडून जनजागृती करण्यात आली. वळसंग पोलिसांकडून वळसंग, कुंभारी, होटगी, विडी घरकुल, आहेरवाडी या गावातून रूट मार्च काढण्यात आला. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली अक्कलकोटचे उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावर, वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगले यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक सागर पाटील, उस्मान शेख, अशोक पाटील, मालचे आणि सीआयएसएफचे जवान, दंगा नियंत्रण पथक, वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी, वळसंग पोलीस ठाण्याचे जवान एकूण ९५ जवान या रूट मार्चमध्ये सहभाग घेण्यात आला होता.

# लोकसभा निवडणुकीच्या पाश्वभूमीवर बोईसरमधील सराईत गुंड हद्दपार

**बोईसर/प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या पाश्वभूमीवर कायदा, सुव्यवस्था बिघडवणाऱ्या असामाजिक तत्त्वांवर पालघर पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. बोईसर पोलिस ठाणे परिसरात अनेक गंभीर गुन्हे दाखल असलेल्या दोन सराईत गुंडांवर हद्दपारीची कारवाई करण्यात आली. अवधनगर आणि धोडीपूजा परिसरात राहत असलेले माया उर्फ महर्षी परशुराम काठे आणि मोहम्मद सद्दाम दिलदार हुसेन शेख या दोन सराईत गुंडांना पालघर, ठाणे, नाशिक व मुंबई उपनगर या चार जिल्ह्यांतून दोन वर्षांसाठी हद्दपार करण्यात आले आहे. बोईसर एमआयडीसी हे पालघर जिल्ह्यातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले पोलिस ठाणे आहे. तारापूर औद्योगिक वसाहतीमुळे या परिसरात राज्याबाहेरील कामगारांची संख्या मोठी असून गुन्हेगारीदेखील वाढत आहे. म्हणून लोकसभा निवडणुकीच्या पाश्वभूमीवर कायदा, सुव्यवस्था बिघडवणाऱ्या असामाजिक तत्त्वांवर पालघर पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.

# दुय्यम निबंधक कार्यालये मार्च अखेरीस येणाऱ्या सुट्यांच्या दिवशीही सुरू राहणार

**पालघर/प्रतिनिधी**

नोंदणी व मुद्रांक विभागाने मार्च अखेरीस येणाऱ्या शनिवार दि. २३ मार्च व रविवार दि २४ मार्च २०२४ त्याचप्रमाणे दि २९, ३० व ३१ मार्च २०२४ रोजी असणाऱ्या सार्वजनिक सुट्टयांच्या दिवशीही पालघर जिल्ह्यातील सर्व दुय्यम निबंधक व सह दुय्यम निबंधक कार्यालये दस्त नोंदणीसाठी सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. तसा आदेश दि. १९ मार्च २०२४ रोजी मा. नोंदणी महानिरिक्षक तथा मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य पुणे हिरालाल सोनावणे साहेब यांनी दि. १९ मार्च २०२४ रोजी पारित केला आहे. दरवर्षी मार्च अखेरीस आर्थिक वर्ष संपत असल्याने जनतेकडुन स्थावर मिळकतीचे व्यवहार पुर्ण करून, मुद्रांक शुल्क भरुन खरेदी दस्तांची नोंदणी मोठ्या प्रमाणात केली जात असते. दरवर्षी प्रमाणे यावर्षदिखील दि १ एप्रिल २०२४ पासुन स्थावर मिळकतीच्या रेडिरेकनरच्या दरात गेल्या दोन-तीन वर्षापासुन वाढ झाली नसल्याने यावर्षी रेडिरेकनरच्या दरात होण्याची शक्यता असल्यामुळे मार्च २०२४ अखेरीस मोठ्याप्रमाणात मुद्रांक शुल्क भरुन दस्त नोंदणी होण्याची अपेक्षा नोंदणी विभाग व्यक्त करीत आहे व तसा अंदाज या क्षेत्रातील तज्ञांकडुन देखील व्यक्त होत आहे. याकारणामुळे यावर्षी मार्च अखेरीस येणाऱ्या वर नमुद सुट्टयांच्या दिवशी देखील पालघर जिल्ह्यातील सर्व दुय्यम निबंधक व सहदुय्यम निबंधक कार्यालये दस्त नोंदणी करण्यासाठी जनतेच्या सेवेत सुरू ठेवण्याचा निर्णय नोंदणी विभागाने घेतला असल्याचे व जनतेने या सुवर्णसंधीचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा व आपल्या दस्तांची नोंदणी मुद्रांक शुल्क भरुन करावी असे आवाहन पालघर जिल्ह्याचे सहजिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी डी. पी. पाटील यांनी जनतेला केले आहे.

# उत्सवाच्या अनुषंगाने वाडा पोलिसांची बैठक संपन्न

**वाडा/प्रतिनिधी**

आगामी सन उत्सवा दरम्याने कोणताही अनुची प्रकार घडू नये, कायदा सुव्यवस्था बाधित राहावी व सर्व सन आनंदात, उत्साहात व शांततेत पार पडावे यासाठी वाडा पोलीस ठाण्यात शनिवारी शांतता कमितीची विशेष बैठक आयोजित केली होती. वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय किंद्रे यांनी ही बैठक बोलावली होती. सदर मीटिंगमध्ये अगामी येणारे सन उत्सव, होळी धुलीवंदन, ईस्टर संडे, गुड फ्रायडे, शिवजयंती व बाबासाहेब आंबेडकर जयंती या येणाऱ्या सण-उत्सवाच्या अनुषंगाने योग्य त्या सूचना देण्यात आल्या तसेच सदर सणाचे अनुषंगाने कुठेही कोणाच्या धार्मिक भावना दुखावणार नाही याबाबत सूचना देण्यात आल्या. होळीच्या



अनुषंगाने रस्त्यावर होळी न पेटवता मैदानात होळी पेटवणे, चाराऊ रानमाळ असलेल्या, भागात होळी पेटवताना योग्य त्या खबरदारी घ्यावा, धुलीवंदन अनुषंगाने रंग खेळताना इतर धर्मीयांच्या भावना दुखावणार नाही याची दक्षता घेणेबाबत सूचना देण्यात आल्या. सोशल मीडियावरील पोस्ट, धार्मिक तेढ अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. व सदर शांतता कमिटीच्या अडीअडचणी जाणून घेऊन त्याबाबत योग्य त्या उपाययोजना करणे बाबत किंद्रे यांनी मार्गदशन केले. याप्रसंगी शरतील विविध राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी, समाजिक कार्यकर्ते, गावातील पोलीस पाटील व नागरिक उपस्थित होते.

# कल्याणमध्ये गर्भपात होण्यासाठी सासुने मारल्या सुनेच्या पोटावर लाथा

**कल्याण/प्रतिनिधी**

दररोज सांगुनही सून गर्भपात करून घेत नाही म्हणून संतप्त झालेल्या सासुने, जावेने आपल्या पोटावर लाथा मारल्या, अशी तक्रार गर्भवती असलेल्या कल्याण पूर्वेतील एका महिलेने कोळसेवाडी पोलीस ठाण्यात केली आहे. कल्याण पूर्वेतील तिसगाव येथील साई दर्शन सोसायटीत राहणाऱ्या एका कुटुंबात हा धक्कादायक प्रकार घडला आहे. सोमवारी रात्री नऊ वाजता हा प्रकार घडला आहे. रेखा भगवान लोकरे (३३) असे तक्रारदार सुनेचे नाव आहे. त्या नोकरी करतात.

रेखा यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी नवी मुंबईतील कामोठे येथे राहणाऱ्या सासु सविता रघुनाथ जावीर (४७), दीर सुरज रघुनाथ जावीर (२८), रोहित (२७), जाव दीपाली सूरज जावीर (२४), प्रकाश काशिनाथ गोरवे (४३), रोहित यांचा एक मित्र आणि एक अनोळखी महिला यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी आरोपी सुरज, दीपाली, प्रकाश यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी सांगितले, रेखा लोकरे या गर्भवती आहेत. त्या कल्याणमधील आईकडे राहतात. त्यांनी गर्भपात करावा म्हणून तिची नवी मुंबईतील सासरची सासू, दीर, जाव ही मंडळी आग्रही आहेत. रेखा त्यांचे म्हणणे ऐकत नाही. सोमवारी रात्री जावीर कुटुंब नवी मुंबईतून कल्याणमध्ये रेखाला जाब विचारण्यासाठी आले होते. सोमवारी रात्री रेखा या दुचाकीवरून जात असताना दीर रोहित याने त्यांना खेचून पकडून ठेवले. जाव दीपाली, सासू सविता यांनी रेखाचे केस पकडून तिच्या पोटावर लाथा मारून आम्ही सतत सांगुनही तू गर्भपात का करून घेत नाहीस, असे बोलत रेखाच्या पोटावर लाथा मारल्या. दोघींनी तिला नखांनी बोचकारून तिला जखमी केले.

आरोपींच्या तावडीतून सुटका करून रेखा घरात बचावासाठी पळून गेल्या. त्यावेळी सात आरोपी बेकायदाशीररित्या रेखाच्या घरात घुसले. रेखाच्या आईला शिवीगाळ करत बेदम मारहाण केली. तसेच, रेखाला घरातही बेदम मारहाण करण्यात आली. या घटनेने खळबळ उडाली आहे. रेखा यांनी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. पोलीस उपनिरीक्षक यु. व्ही. जाधव तपास करत आहेत.

25 TO 31 MARCH 2024 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 3/23/2024 8:40 PM Page 1



# भिवंडी लोकसभा मतदारसंघासाठी शासकीय यंत्रणा सज्ज

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी लोकसभा निवडणुकीसाठी शासकीय यंत्रणा सज्ज झाली असून, अचार संहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक विधानसभा निहाय नऊ असे ५४ भरारी पथके २४ तास कार्यरत राहणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी संजय जाधव यांनी दिली आहे. ते भिवंडी उपविभागीय अधिकारी कार्यालयात गुरुवारी आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. या प्रसंगी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी उदय किसवे व जनसंपर्क अधिकारी मिलिंद पळसुले उपस्थित होते. भिवंडी भिवंडी लोकसभा मतदारसंघा साठी २६ एप्रिल रोजी अधिसूचना जारी केली जाणार असून तीन मे पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आहे.चार मे रोजी उमेदवारी अर्ज यांची छाननी होऊन सहा मे पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. तर या मतदारसंघात २० मे रोजी मतदान होणार असून चार जून रोजी मतमोजणी भिवंडी तालुक्यातील सावद येथील प्रशस्त गोदामात आयोजित करण्यात आले आहे. त्याच ठिकाणी ईव्हीएम मशीन संरक्षित ठेवण्यासाठी स्ट्राँग रूम सुद्धा बनवण्यात येणार आहे. भिवंडी लोकसभा मतदारसंघात २० लाख ३९ हजार ४४९ मतदार यांची नोंद करण्यात आलेली असून येत्या तीन मे पर्यंत मतदार नाव नोंदणीची



मुभा असल्यानं ही मतदार संख्या अजूनही वाढणार आहे.या मतदारांमध्ये ८५ वर्षांवरील २०२७२ व दिव्यांग असलेले ९०५३ असे एकूण २९३२५ मतदारांची नोंद असून या निवडणुकीत प्रथमच ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक व ४० टक्क्यांपेक्षा अधिक अपंगत्व असलेल्या नागरिकांना टपाला द्वारे मातदान करण्याची व्यवस्था निवडणूक आयोगाने केली आहे. या निवडणुकीसाठी २१८९ मतदान केंद्र असणार असून यामध्ये मुरबाड विधानसभा क्षेत्रात सर्वाधिक ५११ मतदान केंद्र आहेत. निवडणुकी संदर्भातील तक्रारी करण्यासाठी, उमेदवारांच्या मालमत्ता व गुन्हेगारी पार्श्वभूमीची माहिती मिळवण्यासाठी, मतदाराला आपले नाव कोणत्या मतदान केंद्रावर आहे हे तपासण्या साठी तसेच अमली पदार्थ, शस्त्र, पैसा, दारू यांची माहिती देण्यासाठी व उमेदवारांना प्रथमच उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सुद्धा विविध प विकसित करण्यात आलेले आहे. तक्रारी संदर्भातील पवर ऑनलाईन तक्रार केल्यानंतर त्याचे निराकरण पुढील शंभर मिनिटांमध्ये करून तशी माहिती निवडणूक प्रक्रिये मार्फत उपलब्ध करून दिली जाणार आहे. या निवडणुकीत उमेदवारास निवडणूक खर्च मर्यादा ही ९५ लाख रुपये करण्यात आलेली आहे अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी संजय जाधव यांनी दिली आहे.

### नियंत्रण कक्ष सुरू

निवडणूक कालावधीमध्ये विविध तक्रारी संदर्भात मुख्य निवडणूक कार्यालयामध्ये नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले असून त्या साठी टोल फ्री क्रमांक १८००२३३१११४ हा सुरू करण्यात आला असून तो २४ तास सुरू राहणार आहे. महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत २०१९ मध्ये भिवंडी लोकसभेतील मतदानाची टक्केवारी ही कमी होती या निवडणुकीत मतदान टक्केवारी वाढीसाठी मतदान जनजागृती कार्यक्रम हे या कालावधीत सुरू राहणार असून समाजाने सुद्धा मतदान प्रक्रियेत अधिकाधिक सहभाग घेण्याचे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी संजय जाधव यांनी शेवटी केले आहे.

# ३०० गुंतवणुकदारांची फसवणूक करणारे त्रिकूट अटकेत

**मुंबई/प्रतिनिधी**

मसाल्याचा व ड्रायफ्रुटचा व्यापार करणाऱ्या रुद्रा ट्रेडर्स या कंपनीमध्ये गुंतवणूक केलेल्या रकमेवर प्रतीमहिना पाच टक्के नफा तसेच ११ महिन्यानंतर गुंतवणूक केलेली मूळ रक्कम परत देण्याचे प्रलोभन दाखवून एका टोळीने ३०० गुंतवणूकदारांकडून तब्बल २६ कोटी रुपये उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात एपीएमसी पोलिसांनी नितीन पार्टे, दीपक सुर्वे, सचिन भिसे या तिघांना अटक केली आहे. या प्रकरणात आरोपी अमोल जाधव या एजंटचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे. या प्रकरणातील आरोपी नितीन पार्टे, दीपक सुर्वे, सचिन भिसे व अमोल जाधव या चौकडीने २०२२ मध्ये एपीएमसीतील सत्रा फ्लाझामध्ये रुद्रा ट्रेडर्स या नावाने कार्यालय थाटले होते. त्यानंतर त्यांनी कंपनीच्या माध्यमातून वेगवेगळ्या गुंतवणुकीच्या स्कीम्स सुरू केल्या होत्या. तसेच याची जाहिरातबाजी देखील केली होती. या कंपनीमध्ये गुंतवणूक केलेल्या रकमेवर प्रतीमहिना पाच टक्के नफा तसेच ११ महिन्यानंतर गुंतवणूक केलेली मूळ रक्कम परत देण्याचे प्रलोभन या कंपनीकडून गुंतवणूकदारांना दाखविले जात होते. या चौकडीच्या प्रलोभनाला बळी पडून शेकडो गुंतवणूकदारांनी लाखो रुपयांची रक्कम गुंतवली होती. गुंतवणूकदारांचा विश्वास बसावा, यासाठी या आरोपींनी गुंतविलेल्या रकमेची सिक्युरिटी म्हणून पोस्ट डेटेड चेक, एफडी सर्टिफिकेट तसेच लक्ष्मी प्रकाश को. ऑप. क्रेडीट सोसायटी या पतपेढीचे एफडी बाँड बनवून दिले होते. टोळीने सुरुवातीला काही प्रमाणात नफा देऊन गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन केला गेला; मात्र नंतर नफा देण्यास टाळाटाळ सुरू झाली. गुंतवणूकदारांनी गुंतविलेल्या रकमेची ११ महिन्यांची मुदत संपल्यानंतरदेखील त्यांनी मुद्दल रक्कम परत करण्यास टाळाटाळ सुरू झाली. शेकडो गुंतवणूकदार या कंपनीच्या कार्यालयात वारंवार खेटे घालत असल्याने अखेर या टोळीने कार्यालय व फोन बंद करून पलायन केले होते. टोळीच्या हातून फसवणूक झालेल्या ३०० गुंतवणूकदारांनी एपीएमसी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी या चौकडीविरोधात गुन्हा दाखल करून त्यापैकी तिघांना अटक केली आहे. न्यायालयाने त्यांना २२ मार्चपर्यंत पोलिस कोठडी ठोठावल्याची माहिती पोलिस उपनिरीक्षक नीलेशकुमार महाडिक यांनी दिली.

# बांगलादेशी नागरिकांसह चार गुन्हेगारांची धरपकड

**नवी मुंबई/प्रतिनिधी**

नवी मुंबई पोलिसांनी तुर्भे एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीत कोंबिंग ऑपरेशन राबवून एका बांगलादेशी नागरिकासह गांजा व तलवार बाळगणाऱ्या चार गुन्हेगारांची धरपकड केली. त्याशिवाय पोलिसांनी रेकॉर्डवरील आरोपी, पाहिजे असलेले आरोपी, गुंड, हिस्ट्रीशीटर, संशयित व्यक्तींची तपासणी करून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई केली. नवी मुंबई पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील परिमंडळ-१ मधील वाढती गुन्हेगारी व अमली पदार्थांचे जाळे उदध्वस्त करण्यासाठी पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशन सुरू केल्यामुळे गुन्हेगारांचे तसेच अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. लोकसभेच्या निवडणुकाची आचारसंहिता लागू झाल्याने नवी मुंबई पोलिसांनी रेकॉर्डवरील आरोपी, पाहिजे असलेले आरोपी, गुंड, हिस्ट्रीशीटर तसेच अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांची झाडाझडती सुरू केली आहे. त्यासाठी नवी मुंबई पोलिसांनी वेगवेगळ्या भागांमध्ये अचानक कोंबिंग ऑपरेशन राबवून गुन्हेगार व बेकायदा कृत्य करणाऱ्यांची धरपकड सुरू केली आहे. पोलिसांनी शनिवारी रात्री तुर्भे एमआयडीसीच्या हद्दीत सायंकाळी ६ ते रात्री ११ पर्यंत कोंबिंग ऑपरेशन राबवले. कोंबिंग ऑपरेशनदरम्यान बगाडे कंपनीच्या पाठीमागे, इंदिरानगर येथे राहुल दांडगे (४१) हा १० किलो २०० ग्रॅम वजनाचा गांजा घेऊन वावरताना आढळून आला. पोलिसांनी त्याला गांजासह अटक केली. तुर्भे एमआयडीसीतील भारत नगर येथे बेकायदा वास्तव्यास असलेला बांगलादेशी नागरिक अनारूल सरदार (४१) याला पोलिसांनी अटक केली.



लोकेश मायानसूर (२८) हा तुर्भे स्टोअर्समधील पाण्याच्या टाकीजवळ तलवार घेऊन फिरताना सापडला. तसेच अवनाश राठोडे (२५) हा केकेआर रोड, तुर्भे स्टोअर परिसरात लोखंडी तलवार घेऊन फिरताना आढळून आला. या दोघांविरोधात गुन्हा दाखल करून अटक केली. हद्दपार केलेला आरोपी नितीन राजपूत यालाही अटक करून त्याच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला. नाकाबंदी करण्यात आलेल्या दोन ठिकाणी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या १०९ वाहनांवर कारवाई करून त्यांच्याकडून ८७ हजार १०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. १३ जणांना समन्स बजावण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे एकावर बेलेबल वॉरंटची कारवाई करण्यात आली आहे. पाहिजे असलेल्या आरोपींची तपासणी करून दोघांवर कारवाई करण्यात आली. ही कारवाई पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या निर्देशानुसार परिमंडळ-१ चे पोलिस उपआयुक्त पंकज डहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

# कब-बुलबुल आणि स्काऊटर - गाईडर यांचा मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांच्या हस्ते सन्मान

**सोलापूर/प्रतिनिधी**

चंद्रशेखर विद्यालय, प्राथमिक शाळा, श्रीपूर, ता.माळशिरस येथील राष्ट्रीय सुवर्णबाण पुरस्कार, नवी दिल्ली प्राप्त ५ कब मुले व ४ बुलबुल मुली यांचा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. वयोगट १० वर्षाच्या आतील स्काऊट-गाईड मधील कब-बुलबुल या वयोगटातील राष्ट्रीय स्तरावरील सुवर्ण बाण पुरस्कार हा सर्वोच्च पुरस्कार आहे. या पुरस्कार प्राप्तीसाठी इयत्ता २री ते ४थी तीन वर्षे कार्य करावे लागते. जिल्हास्तर व राज्य स्तरावर परीक्षा उत्तीर्ण होऊन प्राविण्य पदके मिळवावी लागतात. सोलापूर जिल्ह्यातील श्री चंद्रशेखर विद्यालय, प्राथमिक शाळा ही या पुरस्कारासाठी पात्र ठरली असून २२ फेब्रुवारी या दिवशी महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करीत या ०९ विद्यार्थ्यांनी पलवल, हरियाणा येथे जाऊन सोलापूर जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले. या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर घेऊन जाणारे मार्गदर्शक स्काऊटर शिक्षक आणि सोलापूर जिल्हा प्रशिक्षण आयुक्त स्काऊट



तथा लीडर ट्रेनर शंकरराव यादव व श्रीमती करुणा धाईंजे यांचाही सत्कार मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी सोलापूर जिल्हा मुख्य आयुक्त तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कादर शेख यांनीही सर्वाचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. तसेच सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात स्काऊट गाईड मधील राज्य पुरस्कार प्राप्त शाळांचे मार्गदर्शक स्काऊटर एस.व्ही.सी.एस. हायस्कूल बोरामणी ता दक्षिण सोलापूर येथील पांडुरंग कुंभार व श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला सोलापूर येथील अर्जुन सुरवसे यांचाही सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सोलापूर भारत स्काऊट आणि गाईड कार्यालयाचे जिल्हा मुख्य आयुक्त तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कादर शेख, जिल्हा चिटणीस दत्तात्रय गाजरे, जिल्हा संघटक स्काऊट श्रीधर मोरे, जिल्हा संघटक गाईड अनुसया शिरसाट, लीडर ट्रेनर महादेव पाटील, श्रीमती लतिफा शेख, श्रीमती विजय लक्ष्मी माळवदकर, विकास वनकसे, मुजावर तसेच कार्यालयीन कर्मचारी विश्वास लिंगराज, श्रीमती रिजवाना पठाण, बंडू बंडगर उपस्थित होते.

# उच्च विज वापर करणाऱ्या वीज ग्राहकांसाठी टॉरेंट पॉवरतर्फे विशेष इंटरॅक्टिव कनेक्ट शिबिराचे आयोजन



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरातील अधिक वीज वापर करणाऱ्या व्यवसायिक व वाणिज्य वीज ग्राहकांसाठी टोरंट पॉवर कंपनी कडून कनेक्ट या नावाने विशेष इंटरॅक्टिव शिबिराचे आयोजन गुरुवारी करण्यात आले होते. उच्च विज पुरवठा असणाऱ्या वीज ग्राहकां सोबत संबंध अधिक दृढ होण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या शिबिरात ३० वीज ग्राहकांनी सहभाग घेतला होता. या शिबिरात ग्राहकांना त्यांच्या विद्युत पूरवठ्या मधील सुधारणेसाठी केलेल्या कामांची माहिती, विविध सेवांची माहिती टोरंट पॉवर कंपनी प्रतिनिधींनी प्रस्तावनेत दिली. तर त्यानंतर झालेल्या प्रश्नोत्तर सत्रात उपस्थित केलेल्या प्रश्नांना कंपनी प्रतिनिधींनी सविस्तर उत्तरे देऊन त्यांच्या शंकांचे निरसन केले. कंपनीच्या वतीने उपाध्यक्ष स्नेहल देसाई, मुख्य व्यवस्थापक बिनू सेतुमाधवन आणि इतर अधिकारी उपस्थित होते. टोरंट पॉवर कंपनी कडून यापुढे सुध्दा उच्च विद्युत ग्राहकांसाठी नियमितपणे इंटरॅक्टिव शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी चेतन बदयानी यांनी दिली आहे.

# कोनसई येथील कंपनीत बॉयलरचा स्फोट एकाचा मृत्यू; दोघे जण जखमी



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील कोनसई गावाच्या हद्दीत असलेल्या टायरपासून उत्पादने बनविणाऱ्या इको ग्रीन नावाच्या कंपनीत शुक्रवारी रात्रीच्या सुमारास बॉयलरचा स्फोट झाल्याने बॉयलरचे झाकन उडून डोक्यात लागल्याने एका कामगाराचा मृत्यू झाला आहे तर इतर दोन कामगार गंभीर जखमी झाले आहेत. मनीष मुन्नीलाल कुमार, (२४) असे मृत्युमुखी पडलेल्या कामगाराचे नावं असून मोहम्मद इश्राफील (१८) व राकेश वाला सोडिया (२८) हे दोन कामगार गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी ठाणे येथे पाठविण्यात आल्याचे माहिती मिळाली आहे. वाडा तालुक्यात अनेक कंपन्या, कारखाने असून येथील कामगारांच्या सुरक्षेसाठी पुरेशे सुरखा साधाने नसल्याने अपघातात कामगार दगावन्याचे प्रकार वारंवार समोर येत आहेत. अशा कंपन्यांनी कामगारांना सुरक्षा साधाने उपलब्ध करून देण्याची मागणी कामगार करत आहेत.

# भिवंडीत चार भंगार दुकानांसह वाहन जळून खाक!



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडीतील अंजुरफाटा ते दापोडा रस्त्यावरील वळ ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यालगत असलेल्या एका भंगार गोदामास रात्री एक वाजताच्या सुमारास लागलेल्या भीषण आग लागण्याची घटना घडली आहे.ही आग एवढी भयानक होती की तिने पाहता पाहता उग्र रूप धारण करीत या आगीत एकूण चार भंगार गोदाम जळून खाक झाली असून या आगीच्या भक्षस्थानी या दुकानांसह नजीकच्या असलेले एक चहाचे दुकान दोन पान टपरी जळून खाक झाल्या आहेत. तर या आगीची झळ रस्त्यावर उभ्या करून ठेवलेल्या वाहनां पर्यंत पोहचल्याने या आगीत एक कंटेनर, एक छोटा बोलेरो टेम्पो व दोन दुचाकी सुध्दा जळून खाक झाल्या आहेत. या आगीत मोठे स्फोट झाल्याची माहिती स्थानिक ग्रामस्थांनी दिली असून या घटनेची माहिती मिळताच भिवंडी अग्निशामक दलाचे एक फायर फायटर वाहन घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी अथक परिश्रम घेऊन चार तासांनी पहाटे ५ वाजता आगीवर नियंत्रण मिळवले. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसून खबरदारीचा उपाय म्हणून नारपोली पोलिसांनी या रस्त्यावरील वाहतूक पहाटे पर्यंत थांबवून ठेवली होती.गोदाम पट्ट्यातील भंगार गोदामात साठवणूक केलेले ज्वालाग्राही भंगार साहित्य हे आगीचे कारण बनत असल्याचे समोर आले आहे. त्याकडे कोणते प्रशासन लक्ष देणार हा खरा प्रश्न आहे.

# वैराग येथील मोक्का गुन्हयातील फरार आरोपी अखेर जेरबंद

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

वैराग येथील मोक्या गुन्ह्यातील फरार आरोपीला सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांना सोलापूर ग्रामीण जिल्हयातील गंभीर स्वरूपाचे मालाविषयी गुन्हे उघडकीस आणणेकामी, व पाहिजे फरार आरोपींचा शोध घेवून पकडणेकामी आदेशित केले होते. त्याप्रमाणे वरिष्ट पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांनी गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सुचना केल्या होत्या. माहे एप्रील २०२१ मध्ये यातील आरोपीतांनी यातील फिर्यादीस स्वस्तात सोने देतो असे सांगून त्यांची फसवणूक करून त्यास जबर मारहाण केल्याने वैराग पोलीस ठाणे गुरनं १७४/२०२१ भादविसंक ३९५, ३९७, ४२० अन्वये गुन्हा दाखल झाला असून त्यामध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा कलम ३(१),३(२), ३(४) प्रमाणे कलम वाढ केली होती. सदर गुन्हयातील काही आरोपी हे गुन्हा झाल्यापासून अदयाप पर्यत आपले स्वतःचे अस्तित्व लपवून फरार झाले होते. सपोनि नागनाथ खुणे व त्यांचे पथक वैराग येथे हजर



असताना, त्यांना त्यांचे गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सदर गुन्हयातील फरार आरोपी नामे नंदकुमार अनसर शिंदे, रा. संजयनगर झोपडपट्टी, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर हा सदर गुन्हा झालेपासून आपले स्वतःचे अस्तित्व लपवून पत्नी मुलासह नवी मुंबई येथील तुर्भे एम.आय.डी.सी. येथे राहत असल्याची गोपनीय बातमी मिळाली. त्यानुसार सपोनि नागनाथ खुणे व त्यांचे पथक मिळालेल्या गोपनीय बातमीच्या आधारे नवी मुंबई येथील तुर्भे एम.आय.डी.सी येथे जावून बातमी प्रमाणे त्याचा शोध घेवून खात्री केले असता, त्यांना बातमी प्रमाणे फरार आरोपी नामे नंदकुमार अनसर शिंदे हा तुर्भे एम.आय.डी.सी पोलीस ठाणे हद्दीत राहत असलेबाबत खात्री झाली. त्याप्रमाणे त्यास शिताफीने सापळा लावून ताब्यात घेवून त्याचे नांव व पत्ता खात्री केली असता, तो वैराग पोलीस ठाणे गुरनं १७४/२०२१ भादविसंक ३९५, ३९७, ४२० व महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा कलम ३(१),३(२), ३(४) अन्वये गुन्हा दाखल होता. त्यास सदर गुन्हयाचेकामी ताब्यात घेवून पुढील कारवाई करीता वैराग पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले आहे. सदर आरोपी विरूध्द गंभीर स्वरूपाचे ०३ गुन्हे दाखल असून त्याचेकडून आणखीन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर गुन्हयाचा पुढील तपास जालिंदर नालकुल उपविभागीय पोलीस अधिकारी बार्शी उपविभाग बार्शी हे स्वतः करीत आहे. सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नागनाथ खुणे, पोलीस अंमलदार शिवाजी घोळवे, ख्वाजा मुजावर, बापू शिदे, हरीदास पांढरे, प्रकाश कारटकर, मोहन मनसावाले, रवि माने, अजय वाघमारे, सुरज रामगुडे, अन्वर अत्तार यांनी बजावली आहे.

# वसईच्या औद्योगिक वसाहतीत प्लास्टीक कंपनीला आग

**वसई/प्रतिनिधी**

वसई पुर्वेच्या नवघर औद्योगिक वसाहतीमधील एका प्लास्टीक कंपनीला गुरुवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास भूषण आग लागली. सुमारे दिड तासांच्या शर्थीच्या प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. आगीच जिवितहानी झाली नसली तरी कंपन्या जळून खाक झाल्याने मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे. नवघर पूर्व औद्योगिक वसाहतीत गीता इंडस्ट्रियल इस्टेट मधील छापरिया इंडस्ट्रीज या कोरोगेटिव्ह बॉक्स बनवणारी कंपनी आहे. गुरूवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास आग लागली. त्यानंतर ही आग बाजूला असलेल्या शैलेश इंडस्ट्रियल इस्टेट मधील गॉलॅपसिबल ट्यूब कॉर्पोरेशन या खेळणी व ॲल्युमिनियम कोलॅप्सिबल ट्यूब्स, मल्टीलेयर लॅमिनेटेड ट्यूब्स बनवणाऱ्या कंपनीत पसरली. अवघ्या काही वेळेत काही वेळातच रोद्र रूप धारण केले. आगीची माहिती मिळताच नजीकच्या नवघर अग्निशमन उप केंद्राच्या अग्निशमन जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर आचोळे मुख्य अग्निशमन केंद्र व सनसिटी येथील उपकेंद्रातून ५ पाण्याचे टँकर आणि ५ अग्निशमन



गाड्याघटनास्थळी दाखल झाल्या. त्यानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू झाले. दुपारी पावणे बाराच्या सुमारास आम्हाला आगीचा कॉल आला. कंपनीने आत शिरायला जागा नव्हती. त्यामुळे आग नियंत्रणात अडचणी आली होती. मात्र सव्वा तासात आगीवर नियंत्रण मिळवले, असे सनसिटी अग्निशमन केंद्र प्रमुख विशाल शिर्के यांनी सांगितले. ही इंडस्ट्रियल इस्टेट राजवली खाडीच्या काठावर असून या ठिकाणी कंपनीचा औद्योगिक कचरा टाकण्यात येतो. बुधवारी देखील या कचऱ्याला आग लागल्याची घटना घडली होती. ती आग पूर्ण पणे विझली नसल्यामुळे ही आग पसरून छापरिया इंडस्ट्रीजला लागली असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे.